रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ८९
www.ramprahar.com

मंगळवार, १५ ऑक्टोबर २०२४ ◆पाने ८◆किंमत ₹२


## अंतरंग

रायगडात परतीच्या पावसाचा भातपिकाला फटका/२

वरदविनायकाच्या महडमध्ये रस्त्यांचे काँक्रीटीकरण/५

ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू कॅमरून ग्रीन दुखापतीमुळे संघाबाहेर/८

## महायुतीच्या नेत्यांची आज संयुक्त पत्रकार परिषद



**मुंबई :** महायुतीतील प्रमुख नेत्यांकडून मंगळवारी (दि. १५) संयुक्त पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्यासह महायुतीतील अन्य महत्त्वाच्या नेत्यांच्या उपस्थितीत दुपारी अडीच वाजता ही पत्रकार परिषद होणार आहे. या वेळी महायुतीच्या जागावाटपाचा फॉर्म्युलाही जाहीर केला जाण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणूक कार्यक्रमाची घोषणा होण्याआधीच जागावाटप जाहीर करून मित्रपक्षांतील संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न महायुतीच्या नेत्यांकडून होऊ शकतो. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी रविवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेतून महायुतीवर आरोप केले होते. या आरोपांनाही महायुतीच्या पत्रकार परिषदेतून उत्तर दिले जाऊ शकते. या पत्रकार परिषदेची सर्वांना उत्सुकता लागली आहे.

# महायुती सरकारचे दिलासादायक निर्णय

## मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध विषयांना मंजुरी

**मुंबई : प्रतिनिधी**

महायुती सरकार राज्याच्या सर्वसमावेशक विकासासाठी जोमाने कार्यरत आहे. या सरकारकडून सोमवारी (दि. १४) झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध निर्णयांना मंजुरी देण्यात आली. मुंबईतील पाच प्रवेश मार्गांवरील टोलमाफ, नदीजोड प्रकल्प, आगरी समाजासाठी महामंडळ आदी निर्णय कॅबिनेटमध्ये घेण्यात आले.



### मुंबईतील पाच प्रवेश मार्गांवरील टोल हलक्या वाहनांसाठी माफ

मुंबईतील पाच प्रवेश मार्गांवरील पथकर (टोल) हलक्या वाहनांसाठी माफ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. याची १४ ऑक्टोबर मध्यरात्री १२ वाजेपासून अंमलबजावणी होईल, असे सांगण्यात आले. सायन–पनवेल महामार्गावर वाशी येथे, लालबहादूर शास्त्री रस्त्यावर मुलुंड येथे, पूर्व द्रुतगती मार्गावर मुलुंड येथे ऐरोली पुलाजवळ, पश्चिम द्रुतगती मार्गावर दहिसर येथील पथकर नाक्यावर हलकी वाहने, शाळेच्या बसेस आणि एसटी बसेस यांना पथकरातून सूट देण्यात आली आहे.

**आगरी समाजासाठी महामंडळ**

आगरी समाजासाठी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या महामंडळाच्या माध्यमातून आगरी समाजातील विविध घटकांसाठी विशेषत: युवकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतील.

**नदी जोड योजनेस मान्यता**

दमणगंगा एकदरे गोदावरी नदी जोड योजनेस तसेच दमणगंगा वैतरणा गोदावदी नदी जोड योजनेस मान्यता देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. दमणगंगा–एकदरे–गोदावरी या योजनेतून मराठवाड्यातील १० हजार ११ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होईल तसेच ६८.७८६ दलघमी पाणी सिंचनासाठी, १३.७६ दलघमी पाणी पिण्यासाठी आणि ९.१७ दलघमी पाणी उद्योगासाठी उपलब्ध होणार आहे.

यापूर्वी दुष्काळग्रस्त मराठवाड्यासाठी कोकणातून पाणी वळविण्याच्या योजनांना मान्यता देण्यात आली आहे. आंतरराज्यीय दमणगंगा–पिंजाळ, नदीजोड प्रकल्प व नारपार गिरणा नदी योजना, पार–गोदावरी, दमणगंगा–वैतरणा–गोदावरी, दमणगंगा–एकदरे–गोदावरी या नदीजोड प्रकल्पांना राज्यांतर्गत प्रकल्प म्हणून राबविण्याचे ठरले आहे. या प्रकल्पाची किंमत दोन हजार २१३ कोटी रुपये आहे.

दमणगंगा वैतरणा गोदावरी नदी जोड योजनेच्या १३ हजार ४९७ कोटी २४ लाख किमतीच्या प्रकल्पासदेखील मान्यता देण्यात आली. हा प्रकल्प दमणगंगा आणि वैतरणा उपखोऱ्यातील ५.६८ टीएमसी अतिरिक्त पाणी स्थानिक वापरासाठी तसेच नाशिक जिल्ह्यातील अवर्षणप्रवण सिन्नर तालुका आणि मराठवाड्यातील जायकवाडी प्रकल्पाच्या लाभक्षेत्राला याचा लाभ होईल.

**अडचणीतील सहकारी उपसा जलसिंचन योजनांचे थकीत कर्ज माफ**

अडचणीतील सहकारी उपसा जलसिंचन योजनांचे थकीत कर्ज माफ करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. याचा लाभ ४२ हजार ८४२ शेतकऱ्यांना होईल.

सध्या राज्यात दोन हजार ६५९ उपसा सिंचन सहकारी संस्था असून २६१ संस्थांकडे बँकांची थकबाकी आहे. या संस्थांपैकी १४४ संस्था सध्या सुरू असून ४७ संस्था अवसायनात व ७० संस्थांची नोंदणी रद्द झाली आहे. मंत्रिमंडळ बैठकीत अवसायनातील व नोंदणी रद्द झालेल्या ११७ संस्थांचे मुद्दल कर्ज ८३ कोटी नऊ लाख माफ करण्यास मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे सध्याच्या कार्यरत १४४ संस्थांचे ५० टक्के मुद्दल कर्ज अशी ४९ कोटी ४५ लाख रुपये माफ करण्यास मान्यता देण्यात आली. अशा प्रकारे एकूण १३२ कोटी ५४ लाख मुद्दल कर्ज माफ करण्यास मान्यता देण्यात आली.

**राज्य शेती महामंडळाची जमीन एमआयडीसीला हस्तांतरित**

पुणे जिल्ह्यातील जंक्शन, भरणेवाडी, अंथुर्णे, लासुर्णे येथील १३१ हेक्टर ५० आर. अशी राज्य शेती महामंडळाची जमीन एमआयडीसीला हस्तांतरित करण्याचा निर्णय या वेळी घेण्यात आला.

जंक्शन येथील २० हेक्टर ३८ आर, भरणेवाडी येथील २४ हेक्टर २४ आर., अंथुर्णे येथील २१ हेक्टर १८ आर. आणि लासुर्णे येथील ६५ हेक्टर ७० आर. अशी ही जमीन चालू बाजारमुल्यानुसार देण्यात येईल.

**कौशल्य विद्यापीठास रतन टाटा यांचे नाव**

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठास रतन टाटा यांचे नाव देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. पद्मविभूषण रतन टाटा कौशल्य विद्यापीठ असे या विद्यापीठाचे नामकरण असेल. ज्येष्ठ उद्योगपती टाटा यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ हा निर्णय घेण्यात आला.

याशिवाय राज्यात प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.०, समाजकार्य महाविद्यालयांमधील अध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट स्किम, आष्टी उपसा सिंचन योजनेस सुधारित मान्यता, वैजापूरच्या शनीदेवगाव बंधाऱ्यास प्रशासकीय मान्यता, पाचपाखाडी येथील जमीन ठाणे मनपास प्रशासकीय भवनासाठी, खिडकाळी येथील जमीन हायब्रिड स्किल विद्यापीठासाठी विनामूल्य, पुणे मेट्रो रेल टप्पा २मधील रेल्वे मार्गिकांच्या कामांना मान्यता, किल्लारीच्या शेतकरी सहकारी कारखान्याचे कर्ज व्याजासह माफ, मिरजच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात इमर्जन्सी मेडिसिनची तीन पदे, खंड क्षमापित झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना जुनी पेन्शन योजना, मराठी भाषेविषयक जनजागृतीसाठी पंधरवडा, अण्णासाहेब जावळे मराठवाडा विकास मंडळ अभ्यासगट, 'उमेद'साठी अभ्यासगट असे निर्णय घेण्यात आले.

# पनवेलच्या महाळुंगीत शेकापला धक्का; कार्यकर्ते भाजपमध्ये



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून पनवेल तालुक्यातील खानाव ग्रामपंचायत हद्दीमधील महाळुंगी येथील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सोमवारी (दि. १४) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या पक्षप्रवेशामुळे ऐन विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेकापला जोरदार धक्का बसला आहे.

**आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले स्वागत**

या वेळी शेकापचे लक्ष्मण नारायण भागिवंत, गणेश सुरेश भागिवंत, प्रतिक नथुराम बेडेकर, दर्शन रमेश पवार, शुभम विलास भागिवंत, जय भगवान तवले यांनी समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश केला. या सर्वांचे आमदार प्रशांत ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील यांनी पक्षात स्वागत केले.

या कार्यक्रमास खानाव ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच शशिकांत दिसले, रवी पाटील, एकनाथ फराड, योगेश पाटील, रघुनाथ पाटील, गणेश तातरे, शिवाजी कर्णूक, अनंता पाटील, प्रशांत बोलाडे, मनीष घागस, निलेश वारदे, निकेश घागस, उमेश वारदे, जयेश पाटील, सचिन दिसले आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अभिनेते अतुल परचुरे यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठी अभिनेते अतुल परचुरे यांचे सोमवारी (दि. १४) निधन झाले. वयाच्या ५७व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात आई, पत्नी आणि मुलगी असे कुटुंब आहे.



काही वर्षांपूर्वी अतुल परचुरे यांना कॅन्सरचे निदान झाले होते. तेव्हा त्यांचे वजनही झपाट्याने कमी झाले होते. तरी त्यांनी हिमतीने कॅन्सरवर मात केली आणि ते ठणठणीत बरे झाले. तब्येत सुधारल्यानंतर त्यांनी पुन्हा कामालाही सुरुवात केली होती, मात्र त्यांच्या निधनाची बातमी आल्याने सर्वांनाच धक्का बसला आहे.

अतुल परचुरे यांनी अष्टपैलू अभिनयाच्या जोरावर रंगभूमी, छोटा पडदा, मालिकाविश्व सगळेच गाजवले. द कपिल शर्मा शो या कार्यक्रमातही परचुरे यांनी काम केले. अलिबाबा आणि चाळीशीतले चोर हा त्यांचा शेवटचा सिनेमा ठरला. मराठी रंगभूमीवर पुन्हा दाखल झालेल्या सूर्याची पिल्ले या नाटकात त्यांची भूमिका होती, पण कॅन्सरनंतरची त्यांची इनिंग दुर्दैवाने फार काळ चालली नाही. त्यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीत हळहळ व्यक्त होत आहे.

## निवडक

### माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर 'अँजिओप्लास्टी'

**मुंबई :** माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे सोमवारी (दि. १४) नियमित तपासणीसाठी मुंबईतील एच.एन रिलायन्स रुग्णालयात गेले असता हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या धमन्यांमध्ये ब्लॉकेज आढळले. त्यामुळे त्यांच्यावर अँजिओप्लास्टी शस्त्रक्रिया करण्यात आल्याचे वृत्त आहे. काही वर्षांपूर्वीदेखील ठाकरेंची 'अँजिओप्लास्टी' झाली होती. दरम्यान, युवा नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी वडिलांची प्रकृती ठीक असल्याचे म्हटले आहे.

### कोरोना लसीच्या दुष्परिणामांचा आरोप करणारी याचिका फेटाळली

**नवी दिल्ली :** कोरोना लसीमुळे रक्त गोठल्यासारखे दुष्परिणाम झाल्याचा आरोप करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (दि. १४) फेटाळली. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी पार्डीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने ही जनहित याचिका केवळ खळबळ उडवण्यासाठी दाखल करण्यात आली होती, असे सांगत याचिकाकर्त्यांना फटकारले.

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑलिम्पिक पदकविजेत्यांचा सन्मान



**मुंबई : प्रतिनिधी**

पॅरिस (फ्रान्स) येथे २०२४मध्ये झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये पदक प्राप्त खेळाडूंना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या हस्ते धनादेश आणि स्मृतीचिन्ह देऊन सोमवारी (दि. १४) सन्मानित करण्यात आले.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या कार्यक्रमास मुख्य सचिव सुजाता सौनिक, क्रीडा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे आयुक्त सुरज मांढरे उपस्थित होते.

ऑलिम्पिक स्पर्धेतील नेमबाजीच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशनमध्ये कांस्यपदक प्राप्त करणारा स्वप्नील कुसळे याला दोन कोटी रुपये आणि पॅरालिम्पिक स्पर्धेत गोळाफेकमध्ये रौप्यपदक प्राप्त करणारा सचिन खिलारी याला तीन कोटी रुपये तसेच स्वप्नीलच्या प्रशिक्षक दिपाली देशपांडे यांना २० लाख रुपये व सचिनचे प्रशिक्षक अरविंद चव्हाण यांना ३० लाख रुपयांचा धनादेश आणि सर्वांना सन्मानचिन्ह देण्यात आले.

याशिवाय बुडापेस्ट (हंगेरी) येथे झालेल्या ४५व्या बुद्धीबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताच्या संघाने सुवर्णपदक संपादन करून ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या संघात राज्याचे बुद्धीबळपटू विदीत गुजराथी व दिव्या देशमुख यांचा समावेश होता. या दोन्ही खेळाडूंचा राज्य शासनाच्या वतीने प्रत्येकी रोख एक कोटी रुपये व त्यांचे मार्गदर्शक अनुक्रमे संकल्प गुप्ता व अभिजीत कुंटे यांना प्रत्येकी १० लाख रुपये इतकी रक्कम व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

# उलवे पोलीस ठाण्याचे शानदार उद्घाटन

## परिसरातील नागरिकांना न्याय मिळेल –आमदार महेश बालदी

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

आमदार महेश बालदी यांच्या पाठपुराव्यातून साकारलेल्या उलवे पोलीस ठाण्याचे उद्घाटन सोमवारी (दि. १४) नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते झाले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना आमदार महेश बालदी यांनी, नव्याने सुरू झालेल्या उलवे पोलीस ठाण्यामुळे येथील नागरिकांना न्याय मिळेल, असे प्रतिपादन केले.



या कार्यक्रमास अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे, सहपोलीस आयुक्त संजय येनपुरे, पनवेल परिमंडळाचे उपायुक्त प्रशांत मोहिते, शेवा बंदर विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. विशाल नेहूल, न्हावाशेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अंजुम बागवान, न्हावे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, माजी ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, जयवंत देशमुख, हेमंत ठाकूर, तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम कोळी, किशोर घरत, निलेश खारकर, धीरज ओवळेकर, वितेश म्हात्रे, दीपक गोंधळी, स्वप्नील म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच पोलीस अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत आहे. एकूण २० पोलीस ठाणी असलेल्या या आयुक्तालय हद्दीत उलवे पोलीस ठाण्याच्या रूपाने एका पोलीस ठाण्याची वाढ झाली असून आता नवी मुंबईतील पोलीस ठाण्यांची संख्या २१वर पोहचली आहे.

उलवे नोडमध्ये मागील सहा–सात वर्षात नागरीकरणामध्ये सातत्याने होणारी लक्षणीय वाढ लक्षात घेता येथे पोलीस ठाण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. यासाठी आमदार महेश बालदी यांनी शासनदरबारी पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून उलवे पोलीस ठाणे कार्यान्वित झाले आहे.

या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंजुम बागवान यांनी लवकरच उलवे पोलीस ठाण्यात प्रभारी अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

# पोषण महिना अभियानात रायगडची उल्लेखनीय कामगिरी; शासनाकडून गौरव

**अलिबाग : प्रतिनिधी**

देशातील कुपोषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी सरकारतर्फे दरवर्षी सप्टेंबर महिन्यात पोषण महिना अभियान राबविण्यात येत आहे. रायगड जिल्हा परिषदेने या अभियानात उत्कृष्ट कामगिरी बजावली. या अभियानाला उत्तम लोकसहभाग मिळाल्याने मागील सलग तीन वर्ष रायगड जिल्हा राज्यात पहिल्या पाच क्रमांकामध्ये राहिला आहे.



या कामगिरीबद्दल रविवारी (दि. १३) मुंबई मलबार हिल येथील सह्याद्री अतिथीगृह येथे रायगड जिल्हा परिषदेला पुरस्कार देऊन राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. किशन जावळे व जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचिक यांनी हा पुरस्कार स्वीकारला. बालविकास प्रकल्प अधिकारी प्रवीण पाटील (पनवेल) व स्नेहा चव्हाण (उरण) उपस्थित होते.

माता आणि बालके सदृढ रहावी यासाठी सरकारतर्फे विविध उपक्रम राबविले जातात. या उपक्रमांतर्गतच माता व बालकांना सशक्त करण्यासाठी पोषण महिना अभियान दरवर्षी सप्टेंबर महिन्यात राबविण्यात येते. या अभियानांतर्गत महिनाभरात रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सर्व अंगणवाडी केंद्रात विविध उपक्रम राबविण्यात येतात. यामध्ये मातेला पोषक आहार व चांगली आरोग्यसेवा मिळण्यासाठी व त्यांचे योग्यपणे पोषण होण्यासोबतच कुपोषण दूर होण्यासाठीच्या विविध उपायांचा व उपक्रमांचा त्यात समावेश आहे. विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन कालावधीदरम्यान हात स्वच्छ धुण्याचे महत्त्व पटवून देण्यात येते. याशिवाय गावांमध्ये प्रभातफेरी काढून आरोग्य व पोषणविषयक संदेशाचा प्रचार व प्रसार करण्यात आला.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी पोषण महिना अभियान यशस्वी होण्यासाठी योग्य नियोजन व मार्गदर्शन केले.

## सिद्दीकी हत्येप्रकरणी तिसऱ्या आरोपीला पोलीस कोठडी

**मुंबई : प्रतिनिधी**

बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणातील तिसरा आरोपी प्रवीण लोणकर याला मुंबईतील कोर्टाने २१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. या हत्या प्रकरणात आतापर्यंत तीन जणांना अटक करण्यात आली आहे.

गोळीबाराच्या घटनेनंतर सिद्दीकी यांच्या हत्येची जबाबदारी स्वीकारणारी एक पोस्ट शुबू लोणकर महाराष्ट्र या फेसबुक पेजवरून शेअर करण्यात आली होती. शुबू हा अकोला जिल्ह्याच्या अकोट येथील शुभम रामेश्वर लोणकर आहे, अशी माहिती पुढे आली. त्यानुसार पोलीस अकोट येथे गेले असता त्याच्या घराला कुलूप होते. शेजाऱ्यांकडून दोघेही भाऊ पुण्यात राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या पुण्यातील घरी छापा टाकला. त्या वेळी शुभम फरार असल्याचे लक्षात आले. पोलिसांनी त्याचा भाऊ प्रवीणला अटक केली. हे दोघेही बाबा सिद्दीकी यांच्या हत्येचा कटात सहभागी होते, असा प्राथमिक अंदाज आहे.

# दिवाळीतील एसटीची हंगामी भाडेवाढ रद्द; प्रवाशांना दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

दिवाळीच्या हंगामात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एक महिन्याच्या कालावधीसाठी प्रवास भाड्यात १० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला होता. शिवनेरी वगळता इतर सर्व प्रकारच्या बसेससाठी २५ ऑक्टोबरपासून दरवाढ लागू करण्यात आली होती, मात्र आता ही भाडेवाढ रद्द करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.



दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये अनेक कुटुंबे गावी, पर्यटनस्थळांना भेटी देण्याचे बेत आखतात. दिवाळीला जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे होणारी गर्दी लक्षात घेऊन एसटी महामंडळ दरवर्षी जादा गाड्यांची घोषणा करते. दिवाळी आणि उन्हाळी हंगामातील गर्दीतून उत्पन्न वाढीसाठी महामंडळ दरवर्षी हंगामी भाडेवाढ करत असते. त्याप्रमाणे या वर्षीदेखील २५ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबरदरम्यान हंगामी भाडेवाढीचा निर्णय घेण्यात आला होता.

एसटीची प्रस्तावित १० टक्के भाडेवाढ विठाई, शिवशाही, निमआराम बसेससाठी लागू होती. एसटी प्रशासनाने या संदर्भातील परिपत्रकदेखील काढले होते, मात्र आता तो निर्णय मागे घेण्यात आला आहे. त्यामुळे 'लालपरी'ने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# बाबा सिद्दीकींच्या मारेकऱ्यांना सोडणार नाही -मुख्यमंत्री शिंदे

**मुंबई : प्रतिनिधी**

बाबा सिद्दीकींची हत्या करणाऱ्या सोडणार नाही. सर्वांना फाशी देऊ, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. मुंबईत इतर राज्यातून येऊन दादागिरी केलेली सहन केली जाणार नाही, असा इशाराही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे.

माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर विरोधकांनी कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जोरदार टीका केली. आरोपीने पोलिसांवर गोळी चालवली तर पोलिसांनी गोळी का चालवली? असे विचारतात हे डबल ढोलकीवाले आहेत.



यांच्यात काही नैतिकता नाही. बदलापूरमधील आरोपीची बाजू घेणारे हे लोक काय कायद्याची भाषा करतात. बाबा सिद्दीकींची हत्या करणाऱ्या सोडणार नाही. सर्वांना फाशी देऊ, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले आहेत. बाबा सिद्दीकी लोकप्रतिनिधी होते. त्यांची हत्या करणाऱ्यांपैकी दोघांना अटक केली असून एक फरार आहे. त्याला लवकर पकडले जाईल. फास्ट ट्रॅक कोर्टात खटला लढून फाशी देण्याची विनंती करु. मुंबईत इतर राज्यातून येऊन दादागिरी केलेली सहन केली जाणार नाही, असा इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे.

बदलापूरच्या आरोपीने पोलिसांवर गोळ्या चालवल्या, त्याचे प्रत्युत्तर पोलिसांनी दिले. तेव्हा विरोधक विचारु लागले पोलिसांनी आरोपीवर गोळ्या का झाडल्या? पोलिसांनी गोळ्या खायच्या का? विरोधी पक्ष म्हणजे डबलढोलकी आहे. बदलापूरच्या घटनेत लहान मुलीवर अत्याचार झाले. त्यातल्या आरोपीची बाजू घेणारे हे विरोधक आहेत. त्यांनी आम्हाला कायदा आणि सुव्यवस्था शिकवू नये तसेच बाबा सिद्दीकी यांच्यावर जो हल्ला झाला आणि त्यात त्यांना ठार करण्यात आले. त्या प्रकरणातल्या एकाही आरोपीला आम्ही सोडणार नाही. सगळ्यांना फासावर लटकवणार अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी केली आहे.

महाविकास आघाडीत तर गृहमंत्री जेलमध्ये गेले होते. कायदा-सुव्यवस्था इतकी बिघडली होती. उद्योगपतीच्या घराखाली बॉम्ब लावत होते, त्यात पोलीस सहभागी होती. हॉटेलमधून पैसे वसूल करीत होते. त्या वेळी गृहमंत्री जेलमध्ये होते. आता जो कायदा हातात घेईल त्याला सोडणार नाही. त्याच्यावर कडक कारवाई केली जाईल. फाशीची शिक्षा दिली जाणार. त्यासाठी पूर्ण प्रयत्न केले जाणार, असा शब्द मुख्यमंत्री शिंदे यांनी दिला आहे.

# रायगडात परतीच्या पावसाचा भातपिकाला फटका

**अलिबाग : प्रतिनिधी**



मागील काही दिवस पडत असलेल्या परतीच्या पावसामुळे रायगड जिल्ह्यात शेतातील भाताची उभी पिके आडवी झाली आहेत. त्यामुळे शेतकरी हैराण झाले आहेत. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची चिंता शेतकऱ्यांना सतावते आहे.

यावर्षी जिल्ह्यात ९८ हजार हेक्टर क्षेत्रावर भातलागवड करण्यात आली आहे. यावर्षीचा पाऊस खूपच समाधानकारक होता. आवश्यकतेनुसार झालेल्या पावसाने पीक चांगले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा भाताचा उतारा चांगला येईल असा अंदाज कृषी विभागाच्या नजर सर्वेक्षणातून समोर आला आहे. त्यामुळे शेतकरी आनंदात होते. पावसाने उत्तम साथ दिल्याने भाताचे पीक जोमदार आले आहे. पिकाच्या गरजेनुसार झालेल्या पावसामुळे सप्टेंबरच्या अखेरच्या आठवड्यातच हळवी पिके कापणी योग्य झाली, मात्र पितृपक्ष असल्याने शेतकऱ्यांनी कापणी सुरू केली नाही. नवरात्र सुरू होताच काही शेतकऱ्यांनी कापणीला सुरुवात केली, मात्र मागील तीन दिवसांपासून बरसणाऱ्या पावसाने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.

कापणीच्या कामाला वेग आला नसला तरी शेतकरी वेळ आणि मजुर मिळतील त्यानुसार भातकापणी करीत आहेत, मात्र संध्याकाळच्या सुमारास विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह बरसणाऱ्या पावसाची धास्ती शेतकरयांना वाटते आहे. त्यामुळे शेतकरी पाऊस थांबण्याच्या प्रतीक्षेत आहेत. काही ठिकाणी कापलेले भातपिक भिजून काही शेतकरयांचे नुकसान झाले आहे. उभे पीक शेतातच आडवे झाले असून शेतात साचलेल्या पाण्यात भाताच्या लोंब्या भिजत आहेत. दोन दिवसांत या दाण्यांना कोंब फुटतील अशी स्थिती आहे.

परतीचा पाऊस यंदा चांगलाच दणका देईल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. त्यामुळे पीकांची कापणी सुरू करायची की, नाही असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. हळव्या जातीचे भातपिक दाणे भरून ७५ टक्के पीके कापणीच्या अवस्थेत आहेत. जर वेळेत कापणी झाली नाही तर लोंब्या शेतातच गळून पडण्याची भीती आहे. गरवी म्हणजे उशिरा येणारे भातपीक तयार व्हायला आणखी आठ दिवस वाट पहावी लागणार आहे.


# जोरदार वाऱ्याने बॅनर पडला

## चौकजवळील कर्जत फाटा येथील घटना

**चौक : प्रतिनिधी**

चौकजवळील कर्जत फाटा येथे जोरदार वाऱ्याने एक बॅनर सोमवारी (दि.१४) कोसळल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. जोरदार वारा असल्याने रस्ता निर्मनुष्य होता.

जोरदार वारा, वीज यांनी हजेरी लावून जनजीवन विस्कळीत करून टाकले भयानक भीती निर्माण झाली होती. शासनाने बॅनर, होर्डिंग काढून टाकण्याचे आदेश



देऊनदेखील स्थानिक पातळीवर प्रशासन लक्ष देत नाही, असेच दिसते. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ येथे चौककडून कर्जतला जाणाऱ्या चौक फाट्यावर होर्डिंगचे साम्राज्य पसरले आहे. तरीही तिथे स्थानिक पातळीवर असणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचे लक्ष नाही. सोमवारी दुपारनंतर जोरदार वारा सुटल्याने तेथील एक होर्डिंग पडून ते पोलीस चौकीवर कोसळले. सुदैवाने तिथे कुणीच नव्हते. त्यामुळे सर्वच प्रकारची हानी वाचली आहे. आता तरी लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

# कोकण विभागीय लोकशाही दिनी पाच अर्ज प्राप्त

**नवी मुंबई :** कोकण विभागीय लोकशाही दिन कोकण भवनमध्ये तहसीदार (सामान्य प्रशासन) महेंद्र बेलदार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. कोकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या आठ असून आलेल्या अर्जांची संख्या पाच आहे, असे एकूण प्राप्त अर्ज १३ होते. त्यापैकी एक अर्ज निकाली काढण्यात आला आहे. त्यापैकी १२ अर्ज प्रलंबित आहेत.

# राजगडावर मधमाशांचा हल्ला; २५ ते ३० पर्यटक जखमी

**पुणे : प्रतिनिधी**

किल्ले राजगड येथील बालेकिल्ल्याजवळ मधमाशांच्या हल्ल्यात २५ ते ३० पर्यटक किरकोळ जखमी झाले, तर तीन पर्यटकांना वेळीच मदत मिळाल्याने त्यांचे प्राण वाचले. ही घटना रविवारी सकाळी ११ वा.च्या सुमारास घडली.

जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे रविवारी किल्ले राजगडावर पर्यटकांची मोठी वर्दळ होती. बालेकिल्ल्याजवळील असलेले मधमाशांचे पोळे उठल्याने येथील पर्यटकांवर मधमाशांनी हल्ला केला. यामध्ये सुमारे २५ ते ३० पर्यटक किरकोळ जखमी झाले. काही पर्यटकांनी स्वतःला वाचवण्यासाठी किल्ल्यावर धावाधाव केली, तर काही पर्यटकांनी गडावर असलेल्या पद्मावती तळ्यामध्ये उड्या घेतल्या. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पुरातत्व विभागाचे कर्मचारी बापू साबळे व विशाल पिलावरे यांनी पर्यटकांना सूचना करीत पुरातत्व विभागाच्या कार्यालयामध्ये आसरा दिला.

जीव वाचवण्याच्या आकांताने काही पर्यटन गडाच्या खाली पळाले. त्यामध्ये मुंबईवरून आलेल्या तीन जणांच्या ग्रुपमधील प्रथम अहिरे (वय २४, रा.अंधेरी वेस्ट, मुंबई) या पर्यटकास मोठ्या प्रमाणात मधमाशा चावल्याने तो गंभीर जखमी झाला होता, तो तसाच जीव वाचवण्यासाठी गड उतरू लागला, मात्र तो दोन ते तीन ठिकाणी तोल जाऊन घसरला. किल्ला अर्धा उतरल्यानंतर त्याला उलटीचा त्रास होऊ लागला.

गडावर जात असलेल्या बारामती येथील रणजीत बिचकुले, मारुती वाघमारे, योगेश मलगुंडे, अनिकेत मलगुंडे, स्वप्नील खरात या तरुणांनी घटनेचे गांभीर्य ओळखत गडावर न जाण्याचा निर्णय घेत प्रथम अहिरे याच्या अंगावरील मधमाशांचे काटे काढून त्यास पाणी दिले व त्यास मदत करीत गडावरून खाली आणले. त्याच्यासोबत असणारे दोन पर्यटक विशाल गायकवाड व शुभम खरे (दोघेही रा.अंधेरी वेस्ट, मुंबई) यांनी मधमाशांपासून जीव वाचवण्यासाठी झाडांमध्ये उडी मारली असल्याची माहिती प्रथम अहिरे यांनी दिल्यानंतर गडावर संपर्क करण्यात आला.

# कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये बहुउद्देशीय इमारतीचे भूमिपूजन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत सहकार नगरमधील कृषी उत्पन्न बाजार समिती उभारत असलेल्या बहुउद्देशीय इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले. या इमारतीमध्ये गोडाऊन व कार्यालयांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात बहुउद्देशीय इमारतीच्या भूमिपूजन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सचिव सुरेश हजारे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर संचालिका अर्चना शेळके यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

या वेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश फराट, उपसभापती कृष्णा बदे, माजी सभापती विलास थोरवे, गजानन पेमारे,



शरद लाड, विष्णू कालेकर, दिनेश जैन, केतन झांजे, संतोष वैखरे, रमाकांत जाधव, मच्छिंद्र कुलाल, दिलीप शेळके यांच्यासह वासुदेव भोईर, हेमंत ठाकरे आदी उपस्थित होते.

सभापती प्रकाश फराट यांनी, एक कोटी १० लाख रुपये खर्च करून ही इमारत उभारण्यात येणार असून त्यामध्ये तळमजल्यावर व्यापारी गाळे आणि पहिल्या मजल्यावर कार्यालये किंवा अन्य व्यापारी सुविधेसाठी जागा उपलब्ध होणार आहे, असे स्पष्ट केले.

# भैरवनाथाचा पालखी आणि काठी नाचवण्याचा सोहळा उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील हालिवली गावाची भैरवनाथ देवाच्या काठीची परंपरा गेली अनेक पिढ्यान्‌पिढ्या चालू आहे. विजया दशमीच्या दिवशी भैरवनाथाच्या नावानं चांगभलं या गजरात हालिवली गावातील सर्वच भक्तांकडून संपूर्ण गावांमध्ये मिरवणूक काढून भजन कीर्तनाच्या गजरात उत्सव साजरा करतात.

भैरवनाथ देवाच्या काठीला रंगीबेरंगी कापड गुंडळून मोर पिसाचे तुरे लावून घंटी बांधून ही काठी दसऱ्याच्या आदल्या दिवशी मानकरी शंकर बोराडे यांच्या प्रांगणात बांधण्यात आली. दसऱ्याच्या दिवशी सायंकाळी ही काठी फिरवत गावाच्या बाहेर पडतात. त्यानंतर आपट्याच्या झाडाकडे दसऱ्याला सोने आणण्यासाठी नागरिक जातात. झाडाला पाच प्रदक्षिणा



घालून आरती करतात. ही परंपरा पिढ्यानपिढ्या चालत आलेली असून ती आजही तशीच सुरू आहे. ही काठी गावातील तरुणांनी हातावर, हनुवटीवर ठेऊन गावाच्या वेशीपर्यंत मिरवणुकीने फिरविली. त्यानंतर ही काठी सोडून ठेवण्यात येते.

# अलिबाग शहरात ९० कोटींच्या प्रकल्पांचे भूमिपूजन




**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग नगर परिषदेच्या हद्दीत ९० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे भूमिपूजन आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, भाजपचे तालुकाध्यक्ष उदय काठे, शहराध्यक्ष अंकीत बंगेरा, सुनील दामले, राष्ट्रवादचे हर्षल पाटील यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

राज्य सरकारच्या नगरोत्थान महाअभियान योजनेंतर्गत अलिबाग शहरासाठी ४९ कोटी १० लाख रुपयांची सुधारित पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे. याच योजनेंतर्गत ६१ कोटी ४१ लाख रुपयांची भुयारी गटार योजनाही मंजूर करण्यात आली आहे. याशिवाय मच्छीमार्केटच्या नूतनीकरणासाठी ८३ लाख रुपये, नाना-नानी पार्कसाठी ६१ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या सर्व कामांचे रविवारी भूमिपूजन करण्यात आले.

या योजनामुळे शहराच्या पाणी आणि सांडपाणी व्यवस्थापनाचा प्रश्न निकाली निघेल, असा विश्वास आमदार महेंद्र दळवी यांनी या वेळी व्यक्त केला.

# वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सलग सुट्ट्या आल्याने मोठ्या संख्येने पर्यटक जिल्ह्यात दाखल झाले होते. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रविवारी (दि.१३) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण ३५७ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून तीन लाख १२ हजार रुपये इतका दंड आकारला आहे.

# माथेरानमध्ये पारंपरिक पद्धतीने अश्वपूजन

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये विजयादशमीच्या दिवशी पूर्वापार चालत आलेल्या परंपरेने अश्वपूजन होऊन आपल्या घरातील सदस्य असलेल्या घोड्याला वेगवेगळ्या फुलांनी सजविले गेले.

विजयादशमी हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्याने घोडेवाल्यांना हा दिवस अतिशय महत्वाचा असतो या दिवशी सकाळी घोड्याचा तबेला स्वच्छ धुऊन चकाचक केला जातो. काही अश्वमालक तबेल्यांमध्ये रांगोळी काढतात. घोड्याला तबेल्याबाहेर काढल्यानंतर गृहिणीकडून त्याची यथोचित पूजा केली जाते. पुजनानंतर घोड्याला आवडीचे खाद्य दिले जाते व त्याला वेगवेगळ्या प्रकारे सजविले जाते. काही घोड्यांवर झुल टाकली जाते तर काही घोडे फुलांनी सजविले जातात.

यंदा दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी ही अश्व मिरवणूक माथेरान शहरात काढण्यात आली. मुख्य बाजारपेठेमधून ढोलताशांच्या गजरात सजविलेल्या घोड्यांना नाचवीत मिरवणूक निघाली होती.





## अश्वमालकांसाठी विजयादशमीचे महत्त्व


**अंदाजे १९९९च्या अगोदर पावसाळ्याच्या चार महिने घोडे तबेल्यांमध्येच असायचे व दसऱ्याच्या दिवशी हा घोडा तबेल्यातून बाहेर आणत असत. चार महिने तबेल्यामध्ये असलेल्या घोड्यांचे या दिवशी पूजन करून व्यवसायासाठी तयार करत. दसरा हा दिवस व्यवसायाची नवीन वर्षाची सुरुवात अशी येथे अश्वचालकांची प्रथा असून हा दिवसाला खूप मानतात, तसेच हा दिवस विजय दिन म्हणूनही साजरा करतात.**

**दसरा हा सण आम्ही घोडेवाले खूप महत्त्वाचा मानतो. याच दिवसापासून आमच्या व्यवसायाला खरी सुरुवात होते. या दिवशी आम्ही प्रत्येक जण आमच्या घोड्याची मनोभावे पूजाअर्चा करून त्याला सजवून अश्वपाल संघटनेमार्फत त्याची मिरवणूक काढली जाते**

**-जयराज बर्गे**, अश्वपालक

## दुखवटा

### सीताराम फडके



**पनवेल** : मोरबे येथील भाजप युवा नेता दिनेश फडके यांचे काका सीताराम दिनकर फडके यांचे बुधवारी (दि.९) निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते. यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी शुक्रवारी (दि.१८) नाशिक येथे तर उत्तरकार्य सोमवारी (दि.२१) मोर्बे येथे राहत्या घरी होणार आहे.

# डॉ. नानासाहेब धर्माधिकारींचे कार्य जगाला प्रेरणादायी

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे गौरवोद्गार





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांचे कार्य हे जगाला प्रेरणा देणारे आहेत, असे गौरोद्गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल आयटीआयच्या नामांतरण सोहळयावेळी काढले.

यासोबतच या ठिकाणी सुरू होणाऱ्या कौशल्य विकास केंद्रालाही महाराष्ट्रभूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांचेच नाव देण्याची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याकडे करणार असल्याचे सांगितले.

पनवेलमधील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला महाराष्ट्र भूषण डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी यांचे नाव देण्याचा एतिहासीक निर्णय सकरारने घेतला. आहे. त्यानुसार हा नामांतरण सोहळा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि.१४) झाला. असून त्यांच्या हस्ते नामांतरण फलाचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, अमरिश मोकल, कर्णा शेलार, मनिषा बहिरा, संस्थेचे प्राचार्य नितीन चौधरी, उपप्राचार्य विजय कुमार टीकोळे, वैभव वैशंपायन यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सुरुवातीलाच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला महाराष्ट्रभूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांचे नाव दिल्याबद्दल सरकारचे आभार मानले तसेच पुढे म्हणाले की, पनवेल आयटीआयला जिल्ह्यात प्रचंड मोठी मागणी आहे. त्यामुळे तीर्थरुप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या नावाची जोड मिळणार असल्याने आयटीआयच्या रुपांतराचा प्रवास खऱ्या अर्थाने सुरू होणार आहे.

औद्योगिक शिक्षण क्षेत्रात हे नामांतरण महत्त्वपूर्ण पाऊल असून, या संस्थेच्या माध्यमातून नव्या पिढीला उत्कृष्ट औद्योगिक कौशल्य मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

# ऑईलने भरलेल्या टँकरला आग

**पनवेल : वार्ताहर**



एलएचएस ब्लॅक ऑईलने भरलेल्या टँकरला अचानकपणे आग लागल्याची घटना पनवेलजवळील करंजाडे परिसरात आज सकाळी घडली आहे.

टँकर क्र एमएच/१५/ईजी/७६३४ यामध्ये इंडियन ऑइल धुतुम येथे सदर टँकर मध्ये एलएचएस ब्लॅक ऑइल (१८००० लिटर) भरून जेएनपीटी हायवे रोडने खोपोली येथे जात असताना करंजाडे याठिकाणी आला असता या टँकरला ड्राइव्हरच्या पायाखालून आग लागली.

घटनेची माहिती पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील, योगेश भोईर, अंमलदार रूपेश ठाकूर, निलेश ठाकूर, विनोद घोडे, निकम, प्रकाश भोरे यांना मिळाली. त्यांनी या घटनास्थळी जाऊन फायर ब्रिगेड महापालिका व ओएनजीसी यांना दिली. घटनास्थळी महापालिका फायर ब्रिगेड आल्यानंतर टँकरची आग विजविण्यात येत असताना तांत्रिक बिघाड झाल्याने पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी पीटर मोबाईलमधून फायर एक्सटेंशन काढून आग विझवली. थोड्या वेळात सिडको फायर ब्रिगेड आल्यानंतर पूर्णपणे आग विजवली आहे.

आगीमध्ये टँकरचे केबिनचे नुकसान झाले. टँकर चालकाचे नाव राम कपिल फलटण चौधरी (वय ५८, रा. वडाळा) मुंबई असे आहे. आगीमुळे कोणतेही जीवितहानी झालेली नाही.



**पनवेल : भाजप युवा नेते हॅप्पी सिंग यांची नुकतीच महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक विकास आयोगात समाजाचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाली आहे. याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी हॅप्पी सिंग यांचे अभिनंदन केले. या वेळी समाजबांधव उपस्थित होते. हॅप्पी सिंग गेली अनेक वर्षे समाजासाठी विशेष कार्य करीत आहेत. नुकतीच आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांची शिफारस केली होती. त्यानुसार महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या सदस्यपदी सिंग यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात फूड केमिस्ट्री स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.१४) रसायनशात्र विभागाने फूड केमिस्ट्री स्पर्धचे आयोजन केले होते.

या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन फुडमधील गुणधर्म आणि त्याची हाताळणी, प्रक्रिया आणि साठवणदरम्यान त्यात होणारे रासायनिक बदल या स्पर्धेच्या माध्यमातून सादरीकरण केले व अन्न रसायनशास्त्र आणि निर्वाहाशी संबंधित आहे याविषयी माहिती दिली.



या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. प्रथमेश उदेकर व प्रा. डॉ. पूजा लांजेकर यांनी काम पाहिले. या स्पर्धेचा निकाल ही जाहीर करण्यात आला प्रथम क्रमांक हनीफा शहा हिच्या ग्रुपने पटकाविला, द्वितीय क्रमांक हंनझला सलतान हिच्या ग्रुपने पटकाविला व तृतीय क्रमांक सलेहा सरगुरु हिच्या ग्रुपने पटकाविला.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या व रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले व सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले. या स्पर्धेसाठी प्रा. डॉ. नीलम लोहकरे व प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. रूपाली नागरेकर व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

दरम्यान, खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात.

# सीकेटी महाविद्यालयात वाणिज्य मंडळाचे उद्घाटन

## पोस्टर्स, मॉडेलचे प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात वाणिज्य मंडळाच्या उदघाटनाचे आयोजन सोमवारी (दि.१४) करण्यात आले.



या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री सनातन धर्म कॉलेज ऑफ कॉमर्स, चेंबूर मुंबई येथील, प्राचार्य डॉ. प्रेरणा शर्मा यांची उपस्थिती लाभली. या वेळी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रो. डॉ. एस.बी. यादव, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख प्रो.डॉ. बी. डी. आघाव व वाणिज्य मंडळाच्या प्रमुख डॉ. कीर्ती वर्मा तसेच व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रो.डॉ. अजय दीक्षित, लेखा व वित्त विभाग प्रमुख डॉ. निलेश कोळी, आणि व्यवस्थापन विभाग प्रमुख प्रा. कुशलकुमार कुराणी हे उपस्थित होते.

सर्वप्रथम प्रमुख पाहुण्या डॉ. प्रेरणा शर्मा यांच्या हस्ते पोस्टर्स व मॉडेलच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रदर्शनात सर्व शाखांकडून विविध विषयांवर विविध पोस्टर्स व मॉडेलस प्रदर्शित करण्यात आले होते. या प्रदर्शनासाठी विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद लाभला. पाहुण्यांनी पोस्टर्सची पाहणी करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले व विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा गुणगौरव करण्यात आला.

वाणिज्य मंडळाच्या वतीने 'हेराल्ड या मॅगझिनचे' अनावरण करण्यात आले. त्याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांनी उपस्थितांना संबोधित करताना महाविद्यालयाच्या कीर्तीचा मागोवा घेतला.

या वेळी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. प्रेरणा शर्मा यांनी वाणिज्य आणि व्यवस्थापनातील अलीकडील कल व वाणिज्य क्षेत्रात होणाऱ्या बदलांचा आढावा दिला. वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रो. डॉ. एस.बी. यादव यांनी अध्यक्षीय भाषण केले. या भाषणामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना वाणिज्य क्षेत्रात निर्माण होणाऱ्या विविध बदलांचा अभ्यास करून निर्माण होणाऱ्या संधीचा फायदा घ्यावा व वाणिज्य क्षेत्रात स्वतःचे करिअर करावे, असे सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लेखा आणि वित्त विभागाच्या प्रा. मोनिका भालेराव यांनी केले तसेच वाणिज्य विभागाच्या प्रा. पूनम शिंदे यांनी कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन केले.

प्रस्तुत कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस.टी.गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# चांद्रसेनीय कायस्थ प्रभू समजोन्नती मंडळाच्या ज्ञाती नामफलकाचे अनावरण

**पनवेल : प्रतिनिधी**

चांद्रसेनीय कायस्थ प्रभू समजोन्नती मंडळ, मुलुंड यांच्या ज्ञाती नामफलकाचे अनावरण रविवार (दि.१३) रोजी संस्थेचे ज्येष्ठ सभासद आणि माजी विश्वस्त डॉ. उल्हास प्रधान यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात सभासद आणि ज्ञाती बंधू-भगिनींनी उत्स्फूर्त भाग घेतला.

मुलुंड येथील दत्ताजी ताम्हणे सभागृहात रविवारी (दि. १३) सकाळी ११ वाजता झालेल्या या कार्यक्रमात बोलताना डॉ. उल्हास प्रधान यांनी मुलुंडमध्ये आपल्या समाजाची लवकरच वास्तू उभी रहावी, अशी अपेक्षा व्यक्त करून त्यासाठी सर्वांनी सढळ हस्ते मदत करण्याचे आवाहन केले. त्याला उपस्थितांनी चांगला प्रतिसाद दिला.

चांद्रसेनीय कायस्थ प्रभू समजोन्नती मंडळ, मुलुंड संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली केतन गुप्ते, सचिव ओमकार गुप्ते, निखिल गडकरी खजिनदार, साईनाथ कर्णिक, मिलिंद अधिकारी व इतर कार्यकारणी सदस्यांनी हा कार्यक्रम यशस्वी केला.



# करंजाडेतील प्रबुद्ध सामाजिक संस्थेत धम्मचक्र प्रवर्तन दिन

**पनवेल : वार्ताहर**

प्रबुद्ध सामाजिक संस्था करंजाडे-पनवेल ६८व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन संस्थेचे अध्यक्ष कुणाल लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली भंत्ते संघपाल यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील बनकर यांनी केले. गौतम अहिरे, बापू सावंत, राजेंद्र घोडके, दिगंबर साळवे, महादेव कांबळे, आयु. यशपाल कांबळे, गणेश डोळस, धनंजय ताटे, अ‍ॅड. प्रवीण ढगे, अर्जुन भगत, नितीन कांबळे, सचिन सोनावणे, प्रदीप वाघमारे, मुकूंद सोनावणे, कमलाकर कांबळे (गुरुजी) आर. डी. गमरे, स्वप्नील पवार, अनिकेत लोंढे, नितीन जाधव, दर्शक सावंत, उज्वला ताई सोनावणे, शैलाताई सोनावणे, आरतीताई लोंढे, नैनाताई देव्हारे, आयुनी सविताताई सावंत, विद्याताई बनकर, समिधाताई तांबे, साधनाताई मोरे, डायनताई गायकवाड, वंदना खंडारे, प्रतिज्ञाताई बोबडे या सर्वांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता विशेष परिश्रम घेतले.

या वेळी करंजाडे मधील धम्मबांधव धम्मभगिनी यांचा जनसमुदाय मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.





**उलवे नोड : येथे नव्याने साकारण्यात आलेल्या पोलीस ठाण्याचे उद्घाटन नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते व आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या कार्यक्रमात भाजप उलवे नोड गव्हाण विभागीय अध्यक्ष अमर म्हात्रे यांनी पोलीस आयुक्त भारंबे यांचे स्वागत केले. या वेळी गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, निलेश खारकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.**

# मुलाच्या नातेवाईकांचा शोध सुरू

**पनवेल :** तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आपटा फाटा साई



गाव येथे एक १३ वर्षीय अल्पवयीन मुलगा मिळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध तालुका पोलीस करीत आहेत. मुलाचे अंदाजे वय १३ वर्षे असे असून, तो आपले नाव लालू नंदू असे सांगत आहे. वर्ण सावळा, उंची पाच फूट, बांधा मध्यम, केस काळे आहेत. या मुलाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी तालुका पोलीस ठाणे (२७४५२४४४) किंवा पोलीस उपनिरीक्षक विष्णू टोणे (९६९६९१३६०७) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उरण महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने नागरी संरक्षण दल, उरण यांच्या सहकार्याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी पाच दिवसाचे पूर्ण वेळ नागरी संरक्षण प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए. शामा यांच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांना प्रशिक्षित व सक्षम बनविण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन केले गेले. शशिकांत सिरसाठ (सहाय्यक उपनियंत्रक, नागरी संरक्षण दल उरण) यांनी व हरेश्वर ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना आपत्तीचे प्रकार, नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती, आपत्तीच्या प्रसंगी घ्यावयाची काळजी व आपली जबाबदारी इत्यादी विषयी मार्गदर्शन केले.

दोरीच्या विविध गाठी व त्याचे उपयोग, आपत्कालीन परिस्थितीत विमोचन करण्याच्या पद्धती, कृत्रिम शोषण पद्धती, आपातकाळात स्वसंरक्षण इत्यादी विषयी प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले व सराव घेतला. आकाश सोळंके व आकांक्षा यांनी प्रशिक्षण देण्यात सहकार्य केले. रायगड व ठाणे जिल्ह्याचे उपनियंत्रक मा. विजय जाधव यांनी शिबिराला भेट दिली व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

उद्घाटन व समारोपीय कार्यक्रमात महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रा. व्हि.एस. इंदुलकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले व हे प्रशिक्षण निश्चितच सहभागी विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे ठरेल, असे प्रतिपादन केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी आय क्यू ए सी समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण व एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी मेहनत घेतली.



## संपादकीय

# संधींच्या दिशेने वाटचाल

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीची भारतीय हवाई दलाच्या विमानासह यशस्वी चाचणी नुकतीच झाली. येत्या मार्चमध्ये व्यावसायिक वापराच्या दृष्टीने हा विमानतळ सुरू होईल, अशी अपेक्षा आहे. या विमानतळामुळे मुंबई आणि महाराष्ट्राच्या विकासाला चालना मिळेलच, शिवाय स्थानिकांसाठीही नव्या रोजगारांच्या असंख्य संधी यातून निश्चितच उपलब्ध होणार आहेत.

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीवर शुक्रवारी भारतीय हवाई दलाने सी-२९५ हे विमान यशस्वीरित्या उतरवले. यामुळे या धावपट्टीची पहिली चाचणी यशस्वी झाली आहे. या यशस्वी चाचणीनंतर या विमानतळावरून मार्च २०२५मध्ये वाहतूक सुरू होण्याची अपेक्षा आहे. विमानतळाचे काम सुरू झाले तेव्हा विरोधकांनी टीका केली होती. आता विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे काम प्रगतिपथावर असून एका धावपट्टीचे काम पूर्ण झाले आहे. धावपट्टीच्या यशस्वी चाचणीमुळे विमानतळाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. विमानतळावर लवकरच नियमित प्रवासीसेवा सुरू होईल ही सर्वसामान्य नागरिक आणि प्रवाशांसाठी मोठीच आनंदाची बातमी आहे. या विमानतळामुळे रोजगाराच्या हजारो संधी निर्माण होणार असून या परिसरात आयटी पार्क आणि व्यावसायिक केंद्रे उभारली जातील, असा विश्वासही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धावपट्टीच्या चाचणीच्या कार्यक्रमात व्यक्त केला. ते खरेच आहे कारण कुठल्याही विमानतळाच्या भोवती प्रवासी वाहतुकीची एक संपूर्ण परिसंस्था आकार घेते. येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांच्या सोयीच्या दृष्टीने तारांकित हॉटेले व इतर सोयीसुविधा उभ्या राहतात. मोठ्या सेवापुरवठादारांच्या जोडीला इतर अनेक पूरक सेवापुरवठादारांना काम मिळते. या साखळीतूनच अनेक नवे रोजगार तयार होतात. या सुविधांच्या पुरवठासाखळीत स्थानिकांना व स्थानिक संस्था-संघटनांना प्राधान्याने संधी उपलब्ध झाली पाहिजे. स्थानिकांनीही काळाची पावले वेळीच ओळखून कौशल्यांनिशी सज्ज राहायला हवे. सरकारी पातळीवरून धोरणनिर्मितीतून स्थानिकांना सहभागाची संधी उपलब्ध करून दिली जायला हवी. एकंदरच विमानतळासारख्या मोठ्या प्रकल्पाद्वारे संपूर्ण परिसरात मोठा कायापालट घडून येऊ शकतो. त्यामुळे नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीच्या यशस्वी चाचणीमुळे एकंदरच विस्तारित महामुंबईच्या आशा-आकांक्षांनीही झेप घेतली असे म्हणायला हरकत नाही. मुंबई शहराच्या मधोमध असलेल्या, झोपडपट्ट्यांनी वेढल्या गेलेल्या सांताक्रुझ-सहारच्या मुंबई विमानतळाच्या हवाई वाहतुकीच्या क्षमतेवर गेल्या कित्येक वर्षांपासून प्रचंड ताण आहे. रोज जवळपास हजार विमाने आणि प्रतिवर्षी सुमारे चार कोटी प्रवाशांची वाहतूक मुंबई विमानतळावरून होते. मुंबईतील एकंदरच दाटीवाटीच्या समस्येमुळे या विमानतळाचे क्षेत्र वाढवण्याचा पर्याय तर उपलब्धच नव्हता. मुंबईच्या विकेंद्रीकरणाच्या योजनेत आणखी एक आंतरराष्ट्रीय विमानतळ नजीकच उभारला जाणे अत्यावश्यक होते, परंतु आधीच्या राजवटीतील ढिलाईच्या कारभारामुळे मुंबई महानगर प्रदेशात रस्ते, रेल्वे व विमानतळ यांचे जाळे वेगाने उभे राहिले नाही. भाजपचे सरकार केंद्रात आणि राज्यात दोन्हीकडे स्थापन झाल्यावर मात्र पायाभूत विकासाच्या कामांनी वेग घेतला. विरोधकांनी त्यातही राजकारण आणून वेळोवेळी अडथळे निर्माण करण्याचे आपले काम सुरूच ठेवले. प्रकल्पांना विलंब झाल्यास त्याचा भार सरतेशेवटी देशातील नागरिकांवरच पडणार असतो. अखेर नवी मुंबई विमानतळावरील वाहतूक प्रत्यक्ष सुरू होण्याचे स्वप्न आता लवकरच साकारण्याची चिन्हे आहेत. येत्या मार्च महिन्यात या नव्या विमानतळावरील वाहतूक सुरू होण्याची शक्यता असून त्यामुळे पुढच्या वर्षी मुंबईच्या विमानतळावरील भार कमी होईल, अशी अपेक्षा आहे.**

# महाडमधील बौद्धकालीन लेण्यांचे संवर्धन व्हावे

**खबरबात**

**महेश शिंदे**

महाडजवळ कोल आणि गांधारपाले गावांजवळ पुरातन बौद्धकालीन लेण्या अस्तित्वात आहेत, मात्र या लेण्या म्हणण्यापुरत्यात अस्तित्वात असून लेण्यांकडे लक्ष देऊन त्यांचे संवर्धन होणे गरजेचे आहे.

थातुर मातुर कामे केली जात असली तरी लेण्यांचे संवर्धन कसे होईल यादृष्टीने प्रयत्न केले जात नाहीत. यामुळे महाडमधील हा बौद्ध वारसा काळाच्या पडद्याआड जात आहे. आपल्या इतिहासाची पाने मात्र नष्ट होत असताना त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

संपूर्ण कोकण परिसराला बौद्धकालीन वारसा आहे. बौद्ध काळामध्ये कोकणाला अपरांत म्हणून ओळखले जात होते. कोकणामध्ये अनेक ठिकाणी बौद्ध वारसा असलेल्या लेण्या यांची साक्ष देत आहेत. महाडमध्ये विष्णुपुलीत हा बौद्ध राजा राज्य करीत होता. त्याकाळात गांधारपाले आणि कोल या दोन गावांमध्ये या लेण्या इ.सन दुसऱ्या शतकामध्ये खोदल्या गेल्या असल्याचे अभ्यासकांचे म्हणने आहे. कोल लेण्या दोन समुहात विभागल्या गेल्या आहेत. महाडपासून जवळपास तिन किमी अंतरावर या लेण्या आहेत. यात पहील्या समुहात पाच तर दुसऱ्या समुहात दोन लेण्या खोदलेल्या आहेत. लेणी क्रमांक एक मध्ये सभागृह, तिसऱ्या लेणीमध्ये दोन समान खोल्या, चौकोनी प्रवेशद्वार पहावयास मिळते. याठिकाणी दोन शिलालेख दिसत आहेत.



या शिलालेखांमध्ये सन किंवा कोणत्या राजांचे असा उल्लेख नसून ज्यांनी या लेण्या बौद्ध धम्माचा प्रसार तसेच व्यापारी केंद्र म्हणून या लेण्यांचा वापर होत असे. महाड तालुक्याला बौद्ध धर्माचा इतिहास असल्याचा हा भक्कम पुरावा आहे. अशाच प्रकारची दुसरी लेणी गांधारपाले गावाजवळ आहे.

मुंबई-गोवा महामार्गालगत असलेल्या या लेण्या महामार्गवरून स्पष्ट दिसत असल्याने आणि तिथपर्यंत जाण्यासाठी पायऱ्या असल्याने त्या स्पष्ट दिसतात. याठिकाणी एकून २६ लेण्यांपैकी दोन मोठे सभागृह याठिकाणी पहावयास मिळतात तर दोन शिलालेख आणि एक नक्षीदार स्तूपदेखील आहे. महामार्गावरून प्रवास करणारे पर्यटक या लेण्या आवर्जून पाहण्यास थांबतात, मात्र या लेण्या देखील दुर्लक्षाचा बळी ठरल्या आहेत.

या लेण्यांकडे प्रशासन आणि भारतीय पुरातत्व विभागाने दुर्लक्ष केल्याने काळाच्या ओघात या लेण्यांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली. सद्या कोल लेण्यांच्या एका समुहातील केवळ एकच लेणी शाबुत राहीली आहे. दुसऱ्या लेण्यांमध्ये माती साचल्याने याठिकाणी लेण्या आहेत का असा प्रश्न निर्माण होतो. लेण्या चढून गेल्यावर पिण्याच्या पाण्याचीदेखील सुविधा नाही. शिवाय येथील लेण्यांमध्ये असलेले जलकुंडदेखील साफ केलेले नाहीत. ऐन रात्रीच्या वेळेस याठिकाणी विजेचीदेखील सुविधा केलेली नाही. पावसाळ्यात जमलेले शेवाळ व उन्हाळ्याल लागणाऱ्या वणव्यामुळे या लेण्या धोक्यात येत आहेत.

लेण्यात असलेले स्तूप झिजून जात आहेत तर लेण्यांची पायथ्याशी दोन स्तूप बेवारस पडलेले आहेत. लेण्यांचे खांब अर्धवट अवस्थेत आहेत. हे खांब पुरातन काळात जसे होते तसे पुन्हा उभे राहिले पाहिजेत. त्याचप्रमाणे लेण्यांमध्ये वीज व्यवस्था आणि बुद्धाची मूर्तीची पुनर्बांधणी होणे गरजेचे आहे. या ठिकाणी असलेल्या शिलालेखावर काचेचे आवरण टाकून जतन करणे आवश्यक आहे.

गांधारपाले लेण्यांच्या पायरी मार्गावर ऐन पावसाळ्याच्या पूर्वी सिमेंटच्या माध्यमातून पायऱ्यांच्या दर्जा भरण्यात आल्या होत्या. हे काम पहिल्याच पावसात निघून गेले आहे. थातूरमातूर कामे करून या ठिकाणी पैसे लाटले जात आहे. या कामातून केवळ ठेकेदारांचे खिसे भरले जात आहेत. या झालेल्या कामांची चौकशी केली जावी, अशी मागणी पर्यटकांकडून होत आहे.

ज्या ठिकाणी गांधार पाले लेण्या आहेत त्या लेण्यांच्या समोरूनच मुंबई-गोवा महामार्ग जातो. पूर्वी हा महामार्ग जमिनीलगत होता. चौपदरीकरणाचे काम करताना या ठिकाणी माती भराव करत उड्डाणपूल करून महामार्ग बनवण्यात आला. यामुळे महामार्गावरून प्रवास करणारे प्रवासी या उड्डाण पुलावरून थेट पुढे निघून जात आहेत. यामुळे नकळत गांधारपाले लेण्यांकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

# आज जागतिक अंध दिन

आज १५ ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक अंध दिन- पांढरी काठी दिन' म्हणून जगभरात साजरा केला जातो. नियतीने डोळ्यातल्या प्रकाशज्योती हिरावून घेत ज्या अंध बांधवांचे आयुष्य अंधःकारमय करून टाकले आहे, त्यांच्या जीवनात यंदाची दिवाळी आशेचा किरण आणेल अशी, आपण प्रार्थना करूया...

डोळ्यावर काळा चष्मा अन् हातात पांढरी काठी घेऊन रस्ता ओलांडणारे, चालत्या रेल्वेत खेळणी विकणारे अंध बांधव आपण पाहतो. त्यांच्या हातातली वरचा भाग लाल व खालच्या बाजूला पांढरी असलेली 'पांढरी काठी'च आता यांची जीवनरेखा (लाईफलाईन) म्हणून राहिली आहे. अंध बांधवांना अंधःकारमय जीवनातून मार्ग काढण्यासाठी 'पांढरी काठी' ही 'नॅशनल असोसिएशन ऑफ ब्लाईंड' (नॅब) या समाजसेवी संस्थेने बहाल केली आहे. अंध व्यक्तींना दिशा दाखविण्याचे काम ही पांढरी काठी करते. समाजाला अधिक संवेदनाक्षम, सहृदय होण्याचा एकप्रकारे संदेश ही 'पांढरी काठी' देत असते.

'डोळा' हा अवयव शरीरात असूनही तो निकामी झालेल्या या मंडळींसाठी 'पांढरी काठी' म्हणजे त्यांना लाभलेले एक अवयवच आहे. अंधबांधवांचा खचलेला आत्मविश्वास या 'पांढरी काठी'ने वाढविला आहे. आता तर ती त्यांची आयुष्याची साथीदार झाली आहे.

अल्युमिनियमची काठी ११० रुपये व लाकडी काठी २४ रु. या मुळ किंमतीत 'नॅब'तर्फे 'ना नफा ना तोटा तत्त्वावर उपलब्ध करून दिल्या जातात. अंध व्यक्तीचे डोळे समोरच्या व्यक्तीला विद्रूप दिसू नये, म्हणून काळा चष्मा अवघ्या १५ रुपयात उपलब्ध करून दिला जात असतो.

गेल्या काही वर्षांपूर्वी अंध व्यक्तीला कुणाच्या तरी आधाराची गरज भासत होती. कारण एकच की, त्यांच्यात आत्मविश्वासाचा अभाव! मात्र ६ ऑक्टोबर, १९६४ला हा दिवस 'पांढरी काठी सुरक्षा दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला गेला आणि जगभरातल्या बहुतेक देशांनी आपापले स्वतंत्र कायदे करून पांढर्या काठीला अंधांची 'आयडेंण्टिटी' म्हणून मान्यता दिली. १५ ऑक्टोबर हा दिवस जगभर 'पांढरी काठी सुरक्षा दिवस' म्हणून साजरा होऊ लागला.

आज साधारणपणे छातीपर्यंत उंचीची, एकसंघ किंवा घडीची पांढरी काठी हातात घेतल्यामुळे पुढे येणारे चढउतार, दगडधोंडे, खाचखळगे, कुत्रे-मांजर असे प्राणी, बसलेली-झोपलेली माणसं असे काठीच्या परिक्षेत्रात येणारे सगळेच अडथळे त्या अडथळ्यांपर्यंत पोहचण्याआधीच काठीमुळे त्यांच्या सहज लक्षात येतात. परिणामी घरातून बाहेर पडणार्या या व्यक्तींना शाळा- कॉलेज, नोकरीव्यवसायाच्या ठिकाणी, बाजार किंवा हव्या असलेल्या ठिकाणी जाऊन इच्छित कार्य साध्य करणं आता या पांढ्या काठीमुळे सहजशक्य झालं आहे.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

### 'या' ट्रिकने डिलीट केलेला व्हॉट्सअ‍ॅप मेसेज वाचू शकता

व्हॉट्सअ‍ॅप आपल्या युजर्ससाठी नवनवीन फिचर आणि ट्रिक्स आणत असते. वापरकर्त्यांना त्यांचा चांगला फायदा होत असतो. त्यामुळेच व्हॉट्सअ‍ॅप अनेकांसाठी उपयुक्त ठरते. व्हॉट्सअ‍ॅप डिलीट केलेल्या मेसेजमध्ये काय होते हे जाणून घेण्याची काही लोकांची खूप इच्छा आहे. जर तुम्हीही अशा लोकांमध्ये असाल तर तुम्हाला डिलीट केलेल्या मेसेजबद्दल अगदी सहज माहिती मिळेल.




तुम्हाला डिलीट केलेले व्हॉट्सअ‍ॅप मेसेजदेखील वाचायचे असतील तर तुम्ही आता डिलीट केलेले व्हॉट्सअ‍ॅप मेसेज सहज वाचू शकता.

व्हॉट्सअ‍ॅप वर डिलीट फॉर एव्हरीवन नावाचे फीचर येतं. या फीचरच्या मदतीने तुम्ही पाठवलेला मेसेज डिलीट करू शकता.

या फीचरनंतर अनेक लोक मेसेज पाठवतात आणि ठराविक वेळेत डिलीट करतात. असं केल्याने काही युजर्स नाराज होतात.डिलीट केलेल्या मेसेजमध्ये काय होते हे जाणून घेण्याची त्यांची खूप इच्छा आहे. जर तुम्हीही अशा लोकांमध्ये असाल तर तुम्हाला डिलीट केलेल्या मेसेजबद्दल अगदी सहज माहिती मिळेल.


यासाठी तुम्हाला फोनमध्ये असलेली एक सेटींग ऑन करावी लागेल. तुम्हाला तुमच्या फोनमध्ये नोटिफिकेशन्स हिस्ट्री ऑन करावी लागेल. ज्यामुळे तुम्हाला सर्व माहिती मिळेल.

अशा परिस्थितीत, एखादा व्हॉट्सअ‍ॅप मेसेज पाठवल्यानंतर तो डिलीट केला तरी तुम्ही तो नोटिफिकेशन हिस्ट्रीमध्ये वाचू शकता.

लक्षात ठेवा की, तुम्ही नोटिफिकेशन हिस्ट्रीमध्ये कोणताही ऑडिओ मेसेज, व्हिडीओ किंवा फोटो ऍक्सेस करू शकणार नाही. तुम्ही फक्त मेसेज वाचू शकता.

तुम्ही नोटिफिकेशन बारमधून थेट हिस्ट्रीवर जाऊ शकता किंवा सेटिंग्जमध्ये हा ऑप्शन ओपन करू शकता. येथे तुम्हाला २४ तासांपर्यंतची हिस्ट्री मिळेल.

# विनोदी लेखक, नाटककार वसंत सबनीस



**निमित्त**

रघुनाथ दामोदर सबनीस उर्फ वसंत सबनीस हे मराठी विनोदकार आणि नाटककार होते. त्यांचा आज स्मृतीदिन आहे. वसंत सबनीस यांचा जन्म ६ डिसेंबर १९२३ रोजी सोलापूर येथे झाला. ते पंढरपूरच्या लोकमान्य हायस्कूलमधून मॅट्रिक (१९४२), पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून बी.ए. (१९४६) झाले. शासकीय नोकरीत असताना ते साहित्यनिर्मितीही करीत. त्यांच्या कविता अभिरूचीसारख्या दर्जेदार नियतकालिकातून प्रसिद्ध होत. पुढे ते विनोदी लेखक म्हणून प्रसिद्धीला आले. रंगभूमीवर त्यांची नाटकेही गाजली.

'पानदान' हा त्यांचा ललित लेखसंग्रह १९५८ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यांच्या विनोदी लेखसंग्रहांपैकी 'चिल्लरखुर्दा' (१९६०), 'भारूड' (१९६२), 'मिरवणूक' (१९६५), 'पंगत' (१९७८), 'आमची मेली पुरुषाची जात' (२००१) हे प्रसिद्ध लेखसंग्रह होत. 'आत्याबाईला आल्या मिशा' (१९८५), 'विनोदी द्वादशी' (१९८८), 'बोका झाला संन्यासी' (२००१) हे त्यांचे काही विनोदी कथासंग्रह. 'निळावंती' (१९६३), 'म्हैस येता घरा' (१९६९), 'सौजन्याची ऐशी तैशी' (१९७५), 'घरोघरी हीच बोंब' (१९७७), 'मामला चोरीचा' (१९८६), 'कार्टी श्रीदेवी' (१९८८), 'गेला माधव कुणीकडे' (१९९४) ही त्यांची रंगभूमीवर गाजलेली नाटके. 'विच्छा माझी पुरी करा' (१९६८) या त्यांच्या लोकनाट्याने यशस्वितेचा विक्रम केला.

ते प्रथम वीणा मासिकातून 'छपरी पलंगाचा वग' या शीर्षकाने प्रसिद्ध झाले. तमाशा या लोककलाप्रकाराला आधुनिक रूप देण्याचा पहिला महत्वाचा प्रयत्न म्हणून हा वग उल्लेखनीय ठरतो. दादा कोंडके, राम नगरकर या अभिनेत्यांची सबनीसांच्या उत्कृष्ट, चुणचुणीत संवादांना समर्थ साथ मिळाली. मार्मिक राजकीय भाष्य आणि चतुर संवाद हे या लोकनाट्याचे वैशिष्ट्य. त्यांच्या दोन विनोदी नाट्यकृतींना १९६३ व १९७२ चे महाराष्ट्र राज्याचे उत्कृष्ट वाङ्मयीन पुरस्कार लाभले. ते किशोर मासिकाचे संपादक होते. विनोदी लेखकाला जीवनाकडे, त्यातील विसंगतींकडे पाहण्याचा वैशिष्ट्यपूर्ण दृष्टिकोण, मार्मिक निरीक्षणशक्ती आणि सहज, उत्स्फूर्त शैली यांमुळे त्यांच्या लेखनाला जिवंतपणाचा, रसरशीत स्पर्श असे. अशा या श्रेष्ठ नाटककाराचे १५ ऑक्टोबर २००२ रोजी निधन झाले.

वसंत सबनीस हे मराठी साहित्यिक, नाटककार होते. लेखक, विनोदी नाटककार, ग्रामीण कथेला विनोदी बाज देणारे कथाकार व पटकथालेखक म्हणून वसंत सबनीस महाराष्ट्रात गाजले होते. त्यांचे मूळ नाव रघुनाथ दामोदर सबनीस होते. चिल्लरखुर्दा (१९६०), भारूड (१९६२), मिरवणूक (१९६५), पंगत (१९७८), आमची मेली पुरुषाची जात (२००१) हे प्रसिद्ध लेखसंग्रह होत. त्यांच्या कथांवरून 'एकटा जीव सदाशिव', 'सोंगाड्या' हे दादा कोंडकेनिर्मित चित्रपट बनले. 'अशी ही बनवाबनवी','एकापक्षा एक', गंमत जंमत', 'नवरी मिळे नवऱ्याला', 'बाळाचे बाप ब्रह्मचारी' ह्या सचिन पिळगावकर यांची प्रमुख भूमिका असलेल्या चित्रपटांच्या कथा-पटकथा सबनीसांच्या होत्या.

पंढरपूरच्या लोकमान्य हायस्कूलमधून वसंत सबनीस १९४२ साली मॅट्रिक झाले. पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून १९४६ साली बी.ए. झाल्यावर सबनीसांनी आयुष्यभर सरकारी नोकरी केली. नोकरी सांभाळून त्यांनी काव्यलेखनाने मराठी साहित्याच्या सेवेचा आरंभ केला. पुढे ते ललित आणि विनोदी लेखनाकडे वळले. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**रसायनी : आपटा फाटा ते रसायनी वळण रस्त्यावर साईडपट्टीला लागून मोठ्या प्रमाणावर गवताचे रान माजलेले आहे. यामुळे साईडपट्टी पूर्णपणे झाकून गेली आहे. वाहने समोरून आली की नीट दिसत नाहीत. त्यामुळे अपघात होऊ शकतो, म्हणून या रोडवरील गवताचे रान कापण्यात यावे, अशी मागणी होत आहे.** (छाया : बी.एस. कुलकर्णी)

## आरोग्य प्रहर

### जन्मावेळी बाळाचं वजन कमी असल्याचे तोटे काय?



सामान्यपणे वेळेवर जन्मलेल्या बाळाचे वजन जन्माच्या वेळी २.५ किलोपेक्षा अधिक असायला हवे. जी मुलं दहाव्या महिन्यात जन्माला येतात त्यांचे वजन ३ ते ४ किलोपर्यंतदेखील वाढलेले असते. त्याच्या उलट जी मुले वेळेआधीच जन्माला येतात. म्हणजेच सातव्या किंवा आठव्या महिन्यात जन्माला येतात त्या बाळांचे वजन सामान्य वजनापेक्षा कमी असते. तरीही जन्मावेळी बाळाचे वजन २.५ ते ३ किलो असेल तर ते योग्य मानले जाते. तर १.५ किलोहून कमी वजनाच्या बाळाला लो बर्थ वेट बेबी म्हटले जाते.

जन्माच्या वेळी बाळाचे वजन कमी असणे योग्य मानले जात नाही. अनेकदा काही अवयव नीटसे विकसित झाल्याने आणि वेळे आधी जन्माला आल्याने वजन कमी भरते. अशा बाळांना अधिक काळजीची गरज असते. कारण अशी मुले स्वत:हून दूध पिण्याच्या स्थितीत नसतात. अनेकदा अशा बाळांना श्वासदेखील घेता येत नाही. अशा नवाजात शिशूंना पीडीयाट्रीक इंटेन्सिव्ह केअर युनिटमध्ये सपोर्ट सिस्टीमवर ठेवले जाते. तेथे मशिनद्वारे त्यांची काळजी घेतली जात असते.

कमी वजनाच्या बाळाला इतर सामान्य वजनाच्या बाळांच्या तुलनेत काविळ होण्याचा धोका सर्वाधिक असतो. अशा बाळांचे शरीर जन्माच्यावेळी पिवळे पडते. या बाळात बिलीरुबिनची कमतरता असते. या बाळांना फोटोथेरपी दिली जाते.

हा एक प्रकारचा उपचार असून यात बाळांना इन्क्युबेटरच्या प्रकाशात बाळांना ठेवले जाते. त्याचे डोळे झाकले जातात. त्यामुळे तीव्र प्रकाशापासून डोळ्यांचे रक्षण होते, परंतू उर्वरित शरीराला लाभ होतो. त्यानंतर बिलीरुबिन चेक केले जाते. अन्यथा बाळांना अधिक काळ रुग्णालयात राहावे लागू शकते.

लहान मुलाला सर्वसामान्यत: इन्फेक्शनचा धोका असतो. परंतू ज्या बाळाचे वजन सामान्यपेक्षा कमी असते. त्यांची इम्युनिटी खूपच कमी असते. त्यांना वारंवार इन्फेक्शन होण्याचा शक्यता असते.

मातेने बाळाच्या जन्मावेळी योग्य आहारात करावा. आणि वेळोवेळी अल्ट्रासाउंड सोनोग्राफीच्या मदतीने बाळाच्या वजनाची खात्री करावी, त्यामुळे बाळाच्या जन्मावेळी त्याचे वजन योग्य राहते आणि आरोग्यदायी बाळ जन्माला येते.

# वरदविनायकाच्या महडमध्ये रस्त्यांचे काँक्रीटीकरण

## भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते कामाचे भूमिपूजन

**खोपोली : प्रतिनिधी**

अष्टविनायकापैकी वरदविनायक गणपती असलेल्या महड गावात सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या माध्यमातून जिल्हा नियोजन अंतर्गत नवीन वसाहतील काँक्रीट रस्ते बांधण्यासाठी निधी उपलब्ध झाला आहे. भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते रविवारी (दि.१३) भूमिपूजन झाले.



महड गावात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती वाढली आहे. नव्या वसाहतीकडे जाण्यासाठी रस्ते नसल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. भाजपचे कर्जत-खालापूर विधानसभा युवा मोर्चा संयोजक प्रसाद पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर दोन रस्त्यांच्या काँक्रीटीकरणासाठी जिल्हा नियोजन अंतर्गत २५ लाख रुपयांचा मंजूर झाला होता. देशमुख यांच्या चाळीपासून ते रामजी गोपाळ पाटील यांच्या शेतघरापर्यंत जाणारा रस्त्याचे काँक्रीटीकरण भूमिपूजन आणि मुकम्मिक विश्वास यांच्या घरापर्यंत जाणारा रस्त्याचे लोकार्पण करण्यात आले असून भाजप महड बूथ प्रमुख प्रवीण पाटील यांच्या मागणीला यश आले आहे.

या वेळी भाजप सरचिटणीस दीपक बेहेरे, उपजिल्हाध्यक्ष विठ्ठल मोरे, सनी यादव, विधानसभा युवामोर्चा संयोजक प्रसाद पाटील, अतुल बडगुजर, तालुकाध्यक्ष युवा मोर्चा नागेश पाटील, रवींद्र पाटील, रवींद्र मोरे, मोहन घाडगे, भरत महाडीक, हरिभाऊ जाधव, दिपक जगताप, विकास रसाळ, मुनीर धनसे, जयेंद्र पाटील, प्रसाद देशमुख, महेश कडू, प्रनेश देशमुख, विशाल लोते, मयूर पाटील, ज्ञानेश्वर पारांगे, बुथप्रमुख प्रवीण पाटील, विलास पाटील, नितेश पाटील, अविनाश पाटील, रमेश पाटील, संतोष पाटील, किशोर पाटील, कैलास पाटील, जयवंत पाटील, संजय पाटील, संकेत पाटील, विश्वास खडे, मुकिम बिवास, रोहिदास पाटील, सुधीर पाटील, राकेश पाटील, भगवान गणेशकर, राज पाटील, जय पाटील, अवधूत पाटील आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

भाजपच्या माध्यमातून दुर्गम भागातील प्रलंबित विकासकामे मार्गी लागली असून येथील जनता भाजपच्या कामगिरीवर प्रभावित होत आहे. महड गावात रस्ता काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन झाले असून काम अत्यंत उत्तम दर्जाचे होणार असल्याने निधी चांगल्या ठिकाणी मार्गी लागला याचे समाधान असल्याचे भाजप सरचिटणीस दिपक बेहेरे यांनी व्यक्त केले आहे.

> **दोन रस्त्यांच्या काँक्रीटीकरण कामाकरीता २५ लाख रुपयांचा निधी जिल्हा नियोजन अंतर्गत उपलब्ध झाल्याने सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण व भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांचे मानत या दोन्ही रस्त्यांच्या काँक्रीकरणाचे काम उत्तम दर्जाचे होईल.**
>
> **-प्रसाद पाटील, भाजप विधानसभा युवा मोर्चा संयोजक**


## निवडक

### खोपोलीत आरएसएसचे पथसंचलन



**खोपोली** : विजयादशमीच्या पार्श्वभूमीवर खोपोलीत रविवारी (दि.१३)सायंकाळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या खालापूर तालुक्याच्या वतीने खोपोली शहरातील काटरंग येथील महालक्ष्मी मंदिराच्या पटांगणात एकत्रीकरण करून तेथून खोपोली शहराच्या विविध भागातून सवाद्य पथसंचलन करण्यात आले. सायंकाळी आलेल्या तुफान पावसाचा पथसंचनालवर कुठलाही परिणाम झाला नाही. अत्यंत शिस्तीत काढण्यात आलेल्या या पथसंचलनाचे खोपोलीकरांनी विविध भागात पुष्पवृष्टी करून स्वागत केले.

### संगमेश्वर मंदिर ट्रस्टतर्फे नवरात्रोत्सव



**माणगाव** : नगरपंचायत हद्दीतील संपूर्ण माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या संगमेश्वर मंदिर ट्रस्टतर्फे मंदिर आवारात यावर्षी प्रथमच ट्रस्टचे अध्यक्ष संजय साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली व वॉर्डाचे नगरसेवक दिनेश रातवडकर, सचिन गोरेगावकर, दीपक म्हशीलकर, रमेश पारखे, रतन धुळे, सुधीर रातवडकर, सुरेश रातवडकर यांच्यासह संगमेश्वर नगर रहिवाशी, कुंभार आळी ग्रामस्थ व देणगीदारांच्या विशेष सहकार्याने नवरात्रोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. मंदिर ट्रस्टतर्फे मंदिर परिसरात या नवरात्रोत्सवानिमित्त आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. नवरात्रोत्सवात संगीत खुर्ची व फॅन्सी वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव यांच्या हस्ते संगीत खुर्ची व फॅन्सी ड्रेस स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# सुरक्षारक्षक भरतीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**रायगड** : टाटा स्मारक हॉस्पिटल परेल यांच्या पत्रान्वये माजी सैनिकांमधून सुरक्षारक्षक व सुरक्षा असिस्टंट पदासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी https://tmc.gov.in/def/inst.aspx या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. अर्जदाराने ऑनलाईन अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्रे अपलोड करावयाची आहेत. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख २१ ऑक्टोबर असून इच्छुक माजी सैनिक उमेदवारांनी सुरक्षा रक्षक व सुरक्षा असिस्टंट पदाकरीता ऑनलाईन अर्ज सादर करावेत असे आवाहन केले आहे.

# दिव्यांगांना कृत्रिम हात, पाय शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात रत्नानिधी ट्रस्ट यांच्या सौजन्याने व आयोजक कुणबी सेवा चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्या पुढाकाराने रविवारी (दि.१३) ट्रस्टचे खजिनदार प्रकाश मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांगांना आधार मोफत कृत्रिम हात व पाय बसविण्याच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिराचा ६५ दिव्यांगांनी लाभ घेतला. या दिव्यांगांना १५ दिवसांत कृत्रिम हात व पाय देण्यात येतील, असे आयोजकांनी सांगितले. शिबिराला तालुका कुणबी समाज मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम, कलगी-तुरा नाच मंडळाचे अध्यक्ष रामभाऊ टेंबे, केंद्रप्रमुख शंकर शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या शर्मिला सत्वे आदींसह अनेक मान्यवरांनी भेटी देली.

**श्री. रणछोडजी देवस्थान ट्रस्ट, पनवेल**

पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड- ४१० २०६

पी.टी.आर.नं.: ए/७८/रायगड

**जाहीर निविदा सूचना**

श्री. रणछोडजी देवस्थान ट्रस्ट, पनवेलच्या मालकीच्या प्लॉट नं. २५४, श्री. रणछोडजी देवस्थान ट्रस्ट, पनवेल (शनी मंदिर) टपाल नाका, पनवेल, जि. रायगड - ४१० २०६. या जागेवर नियोजित मंदिर बांधण्याआधी सध्याचे जुने बांधकाम पाडून त्यावरील सर्व वस्तू (दगड, विटा, वाळू, लोखंड, लाकडे, प्लास्टिक, इत्यादी सर्व वस्तू) विकत घेऊन जागा समतल करुन देणे. त्यासाठी इच्छुक कंत्राटदार/व्यक्ती/ कंपनी/ इत्यादींकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

त्याबाबतचे निकष, अटी शर्ती व निविदेचे माहिती ही त्यावेळी देण्यात येईल. सदर निविदा दुकान क्र. १४, इंद्रप्रस्थ इमारत, टपाल नाका, उरण रस्ता, पनवेल, जि. देण्यात यावी. रायगड - ४१० २०६. या अधिकृत पत्त्यावर प्रत्यक्ष अधिकृत स्थळी निविदा जाहीर केल्यापासून सात दिवसांच्या आत सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०५.०० पर्यंत प्रत्यक्ष हजर राहून निविदा सादर कराव्यात. लिलावाची वेळ, दिवस नंतर कळविण्यात येईल. केवळ संपर्कासाठी अधिकृत मोबाईल क्र. ९३२३९५०१०० वर संपर्क साधावा.

**श्री. कैलास शशिकांत देशमुख**
मॅनेजिंग ट्रस्टी / मुख्य विश्वस्त
श्री. रणछोडदासजी देवस्थान ट्रस्ट, पनवेल

# पाली येथे महिलांकरिता उद्योजकता प्रशिक्षण

**रायगड : रामप्रहर वृत्त**

भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआयआय) व टाटा कम्युनिकेशन्स मुंबई यांचेद्वारा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील महिला व दिव्यांगांकरीता महिला उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे सोमवारी (दि.२१) सुधागड येथे आयोजन करण्यात आले आहे.

टाटा कम्युनिकेशन्सच्या सामाजिक दायित्व विभागांतर्गत पुरस्कृत हा प्रशिक्षण कार्यक्रम असून यामध्ये उद्योग संधी व निवड, बाजारपेठ सर्वेक्षण, विपणन व्यवस्था, व्यवसायाचे व्यवस्थापन, सिध्दी प्रेरणा, क्षेत्रभेट, शासकीय कर्ज योजनांची माहीती, उद्योगासाठी लागणारे विविध परवाने, संवाद कौशल्य, उद्योगाची हिशोब पद्धती इत्यादी विषयावर तज्ज्ञ प्रशिक्षकाद्वारे मार्गदर्शन करण्यात येईल. हे प्रशिक्षण निः शुल्क आहे. या प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्याकरीता शिक्षण सातवी पास ते पुढे वय १८ वर्षे पूर्ण ४५ वर्षापर्यंत असावे, तसेच प्रशिक्षणामध्ये नियमित हजर राहण्याची तयारी असावी. प्रशिक्षण प्रवेश अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड, रेशनकार्ड, एक फोटो आदी कागदपत्राची झेरॉक्स प्रत जोडावी प्रशिक्षणानंतर प्रशिक्षणार्थीना प्रमाणपत्र वितरीत करण्यात येईल. प्रशिक्षणाच्या अधिक माहितीकरीता व प्रवेश अर्जाकरिता शशिकांत दनोरीकर प्रकल्प अधिकारी, भारतीय उद्योजकता विकास संस्था, अलिबाग भ्रमणध्वनी (७७७५८०२४९७) यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन आहे.

**To Whomsoever It May Concern**

I had given a Public Notice in News Paper daily "Kille Raigad" dated 10/10/2024, for and on behalf of MR. GOVINDJI LALJI SANGHANI, inviting information in respect of the lost document Agreement for Sale, dated 14/09/2024 vide document No. 15159/2024, concerning Flat No. 902, A- wing, on the 9th Floor, of Building Known as 'AMRUT VIEW', admeasuring 72.160 Sq. Mtrs. Built Up Area & 7.525 Sq.Mtrs. Balcony Area, lying and situated at Plot No. 47 & 48, Sector No. 3, Karanjade, Navi Mumbai, Tal. Panvel, Dist. Raigad.

I hereby certify that I have not received any information in regard to the lost document Page No. 1,2 and 57 to 64, dated 14/09/2024, concerning Flat No. 902, A wing, on the 9th Floor, of Building Known as 'AMRUT VIEW', admeasuring 72.160 Sq. Mtrs. Built Up Area & 7.525 Sq.Mtrs. Balcony Area, lying and situated at Plot No. 47 & 48, Sector No. 3, Karanjade, Navi Mumbai, Tal. Panvel, Dist. Raigad, specifically mentioned in the public notice till date.

**Date: 10/10/2024.**

**Sd/-**
**Jayvant Eknath Bhopi.**
**Advocate-Panvel**

Address : For correspondence: Shop No. 13, Ground Floor, Varad Vinayak Complex, Plot No. 3, Sector 05, Opp. Gurudwara, New Panvel, Tal. Panvel, Dist. Raigad 410206.
Email-jaywantbhopi7772@gmail.com, Cell No.9022317772

**पनवेल महानगरपालिका**

ता. पनवेल, जि.रायगड

कार्यालय :- उपायुक्त मुख्यालय, १ला मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल- ४१० २०६ दूरध्वनी क्र. ०२२२७४५८०४०/४१/४२

Email Id : panvelcorporation@gmail.com Website : www.panvelcorporation.com

**जाहीर आवाहन**

वातावरणातील बदलांमुळे मुंबई महानगर प्रदेशातील हवेच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे. याचा परिणाम म्हणून हवेतील प्रदूषणात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या पार्श्वभूमीवर पनवेल शहरातील वायू प्रदूषण नियंत्रणासाठी पनवेल महानगरपालिकेच्या वतीने बांधकाम विकासकांना मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आली आहेत सर्व संबंधित यंत्रणासाठी ही मार्गदर्शक तत्वे अनिवार्य आहेत, त्यांचे अत्यंत काटेकोरपणे पालन केले जावे, तसेच याबाबत कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आल्यास संबंधितांवर सक्त कारवाई केली जाईल, अशा सूचना पनवेल महानगरपालिकेतर्फे देण्यात आल्या आहेत. सर्व प्रभागांच्या प्रभाग अधिकाऱ्याच्या स्तरावर भरारी पथके गठीत करून बांधकाम ठिकाणांची पाहणी करणेकामी तातडीने नेमणूक करण्यात आली आहे.

दिवाळी सण तोंडावर असून हिवाळयामध्ये वाढणा-या धूळीकणांची संख्या लक्षात घेता प्रदूषण कमी करण्यासाठी बांधकाम व्यवसायिकांना त्यांच्या बांधकाम / विकासकाम कामांची मार्गदर्शक तत्वांनुसार बारकाईने तपासणी करण्याची व बांधकाम / विकासकाम साईटभोवती हवेची गुणवत्ता राखण्यासाठी आवश्यक उपकरणे खरेदी करणे आणि आवश्यक उपाययोजना करणेबाबत निर्देशित करण्यात आले आहे. सद्यस्थितीत पावसाळा संपत येत असल्यामुळे महानगरपालिका क्षेत्रात सुरू असलेली बांधकामे, विकासकामे, वाहनांची वाढती संख्या यामुळे शहरातील धुळीचे प्रमाण वाढीस लागून हवा प्रदूषणासाठी धूळ

हा घटक प्रामुख्याने कारणीभूत ठरत आहे. आता पावसाळा संपताच खबरदारी म्हणून मा. उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश व महाराष्ट्र शासन स्तरावरून निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांची तात्काळ प्रभावाने अंमलबजावणी करण्याचा निर्णय पनवेल महानगरपालिकेतर्फे घेण्यात आला आहे.

**मार्गदर्शक तत्वे**

१. सर्व विकासकांनी बांधकाम प्रकल्पांच्या भोवती किमान २५ फूट उंचाचे धातूच पत्र लावण आवश्यक आहे.
२. बांधकाम चालू असणाऱ्या सर्व इमारतींच्या भोवती ओल्या हिख्या कापडाने ओल्या तागाच्या कापडाने / ताडपत्रीने बंदिस्त करणे आवश्यक आहे. स बांधकामच्या ठिकाणी वॉटर स्प्रिंकलर / स्मॉग गन द्वारे सतत फवारणी करावी.
३. पाडण्यात आलेल्या सर्व बांधकामांना वरपासून खालीपर्यंत ताडपत्री / ओल्या हिरव्या कापडाने / ओल्या ज्यूटच्या कापडाने झाकलेले असावे. संरच पाडण्याच्या प्रक्रियेदरम्यान सतत पाणी शिंपावे/फवारणी करणे आवश्यक आहे.
४. बांधकामाच्या ठिकाणी मोबाईल अँटी स्मॉग गन च्या सहाय्याने लोडिंग / अनलोडिंग दरम्यान पाणी फवारणी करणे बंधनकारक असेल.
५. बांधकाम जागेवरील हवेमध्ये प्रदूषण करणाऱ्या भंगार / पाडकाम साहित्यावर पाणी शिंपणे बंधनकारक असेल.
६. बांधकाम साहित्य तसेच रेडी मिक्स काँक्रीट वाहून नेणारी सर्व वाहने पूर्णपणे वरच्या बाजूने व सर्व बाजूंनी पूर्ण झाकलेली असावीत. वाहनातून कोणत्या प्रकारे गळती होऊ नये तसेच ओव्हरलोड होऊ नये, ह्याची दक्षता घेणे बंधनकारक असेल.
७. सर्व बांधकामाच्या ठिकाणी सी.सी.टी. व्ही कॅमेरे बसवावेत.
८. सर्व बांधकामाच्या ठिकाणी सेन्सर आधारित वायू प्रदूषण मॉनिटर्स लावणे बंधनकारक असेल, प्रदूषणाची पातळी ओलांडणार नाही याबाबत उपाययोजन कराव्यात. याबाबतची माहीती महानगरपालिका अधिकाऱ्यांना वेळोवेळी मागणीनुसार पाहणीकरिता उपलब्ध करावी.
९. सर्व बांधकामाच्या ठिकाणी ग्राईडिंग, कटिंग, ड्रीलिंग, सोईंग आणि ट्रिमिंग ची कामे बंदिस्त भागात करावी व हवेचे प्रदूषण कमी करण्यासाठी पाण्याचे स्प्रिंकल वापरून सतत फॉगिंग करावी.
१०. सर्व बांधकामाच्या ठिकाणी तयार होणाऱ्या बांधकाम व पाडकाम (C&D कचरा) नेमून देण्यात आलेल्या अनलोडींग साईट वर टाकणेबंधनकारक असेल सदरचा मलबा उतरवल्यानंतर वाहन पूर्ण स्वच्छ करणे बंधनकारक असेल.
११. सर्व बांधकाम कर्मचारी व संबंधित व्यवस्थापकांनी अनिवार्यपणे वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे जसे की मुखवटे, गॉगल, हेल्मेट इत्यादी परिधान करण आवश्यक आहे.
१२. बांधकाम साहित्य आणि C&D वेस्ट साहित्य वाहून नेणारी वाहने ह्यांच्यावर वाहन ट्रेकिंग यंत्रणा बसवणे बंधनकारक असेल व सदरच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्याचे तसेच ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्यांचे वाहन तत्काळ जप्त करण्याबाबत पोलीस विभागाकडून कारवाई करण्यात येईल ह्याची नोंद घ्यावी.
१३. साहीत्य वाहून नेणाऱ्या सर्व वाहनांकडे वैध PUC प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
१४. बांधकामाच्या ठिकाणी असणारी माती, वाळू, बांधकाम साहित्य हे बंदिस्त भागामध्ये साठविण्यात यावे व ते पूर्णपणे झाकलेले असावे. सदरचे साहित्य कोणतेही
सार्वजनिक रस्ते, पदपथ, फुटपाथ आणि मोकळ्या जागेवर साठवले जाणार नाही ह्याची खात्री करावी. त्या सदर बाबींवरती नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.
१५. कुठल्याही प्रकारे उघड्यावरती कोणत्याही प्रकारचा कचरा जाळण्यास पूर्णपणे बंदी आहे याची नोंद घ्यावी, सदर बाबींचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
१६. महानगपालिकेद्वारा तपासणी करण्यासाठी मोबाईल स्कॉड (फिरते पथक) निर्माण केले असून वरील सूचनांचे पालन न करणाऱ्या विकासकांवर तत्काळ कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**दिनांक १४/१०/२०२४.**
**जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.५६५/५६७/२०२४**

**सही/-**
**आयुक्त तथा प्रशासक**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

# मृत वृद्धेच्या नातेवाईकांचा शोध सुरू

**खोपोली** : मृत झालेल्या वृद्धेच्या नातेवाईकांचा सहा महिने उलटूनदेखील लागलेला नाही.

मे २०२४मध्ये कर्जत-खोपोली रोडवर अंदाजे ७० ते ७५ वर्षांची वृद्ध महिला बेशुध्दावस्थेत आढळली होती. या वृद्ध महिलेच्या अंगात निळ्या रंगाचे पोलके व पिवळ्या रंगाची फाटकी साडी, केस पांढरे अशा वर्णनाची महिला होती. तिला उपचाराकरीता पोलिसांनी प्राथमिक आरोग्य केंद्र खालापूर येथे आणण्यात आले होते. आरोग्य केंद्रातील डॉक्टरांनी तपासणीनंतर तिला मृत घोषित केले होते. तिच्या नातेवाईकांबाबत पोलिसांनी डोलवली, मानकवली, हाळ खुर्द, आंजरुण व आजुबाजुचे गावात चौकशी केल्यानंतर देखील काही माहिती उपलब्ध न झाल्याने मयत महिलेची ओळख पटलेली नाही.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ५४/२०२४-२०२५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | महाड औद्योगिक क्षेत्रातील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती .. नांगलवाडी कॉलनी परिसरातील मनोरंजन हॉलची दुरुस्ती करून रंग लावणे. | ₹ ३९,०३,२९५.०० |
| २ | नवीन पाताळगंगा पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... अशुद्ध व शुद्ध जलउदंचन गृहातील १५०/७५/५० अश्वशक्ती क्षमतेच्या पंपिंग मशिनरीची दुरुस्ती व ओव्हरहॉलिंग स्पेअर्ससह करणे. | ₹ ४०,३१,०९०.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १४/१०/२०२४ ते दिनांक २१/१०/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १६/१०/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १७/१०/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना

**ई निविदा सूचना क्र. ४४/२०२४-२०२५ (मुंबई) करीता**

दिनांक ०६/१०/२०२४ रोजी दैनिक आपलं महानगर, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक रामप्रहार, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचेनांव | अंदाजितरक्कम |
|---|---|---|
| १. | रोहा औद्योगिक क्षेत्राजवळील वरसे गावामधील रस्त्यांचे काँक्रीटीकरणाद्वारे मजबुतीकरण करणे व रस्त्याच्या बाजुला आर. सी. सी. गटारे बांधणे. | ₹३,३८,७७,२०८.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २४/१०/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

## निवडक



### सहकारी सोसायटीचे उद्घाटन

**उरण :** श्रीगणेश हनुमान मच्छीमार सहकारी सोसायटी उरण तालुक्यातील कुंडेगाव येथे श्रीगणेश हनुमान मच्छीमार सहकारी सोसायटी या नवीन मच्छीमार सोसायटीचे उद्घाटन शनिवारी (दि.१२) विजयादशमीच्या (दसऱ्याच्या) शुभ मुहूर्तावर झाले. या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य सीताराम नाखवा, मच्छीमार कार्यकर्ते मार्तंड नाखवा, श्रीगणेश हनुमान मच्छीमार सहकारी सोसायटी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत पाटील, ग्रुप ग्रामपंचायत नवघर सरपंच नितीन मढवी, सामाजिक कार्यकर्ते मनोहर पाटील, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कामगार नेते महेंद्र घरत यांची निवड



**उरण :** जगातील १६० देश सभासद असलेल्या इंटरनॅशनल ट्रान्सपोर्ट वर्कर्स फेडरेशन (आयटीएफ) लंडन या बहुराष्ट्रीय संघटनेचे अधिवेशन १२ ते १९ ऑक्टोबर रोजी मोरोक्को येथे सुरु आहे. या बहुराष्ट्रीय संघटनेच्या जागतिक कार्यकारिणीची निवडणूक १३ ऑक्टोबर रोजी झाली. या निवडणुकीत भारतातून कामगार नेते महेंद्र घरत यांची एक्सिक्युटीव्ह मेंबरपदी निवड करण्यात आली. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

### बांधकाम कामगारांना भांडीवाटप

**उरण :** तालुक्यातील बांधकाम काम करणाऱ्या कामगारांना रायगड जिल्हा बांधकाम कामगार मंडळातर्फे गृहोपयोगी भांडी वाटप कार्यक्रम चारफाटा उरण येथे आयोजित करण्यात आले. गेले वर्षांपासून पाठपुरावा करून सर्व कागदपत्र जमा करून त्या कामगारांना बांधकाम मंडळात नोंदीत करण्यात आले. बिगारी, मिस्त्री, गंवडी, सुतार, रंग कामगार, वायरमन व नाका कामगार असे असंख्य कामगार नोंदीत नाहीत त्यांना नोंदीत केल्यावर या दिवाळीत ५००० बोनस, पहिली ते पदवीधर मुलांना २५०० रुपयांपासून एक लाख रुपयांपर्यंत शैक्षणिक भत्ता, वैद्यकीय अपघातग्रस्त मयत कामगारांना रुपये पाच लाख मदत, अपंगत्व आल्यास एक लाख रूपये मदत, मातृत्व वेळी व लग्नासाठी मदत असे अनेक लाभ व सुरक्षा किट या कामगारांना मिळणार आहेत.



### समस्या सोडविण्यासाठी आंदोलन

**नवी मुंबई :** शिक्षण, आरोग्य, रोजगार यांसह नवी मुंबईला अनेक समस्यांनी वेढले आहे. या सर्व समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी सोमवारी मनसे प्रवक्ते व नवी मुंबई शहर अध्यक्ष गजानन काळे यांनी वाशीमधील छत्रपती शिवाजी महाराज चौकात परिवर्तन आंदोलन केले. परिवर्तन आंदोलनादरम्यान गजानन काळे आणि अनेक महाराष्ट्र सैनिकांनी रक्तदान केले. या आंदोलनादरम्यान गजानन काळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी चळवळीतील गाणी गाऊन उपस्थितांमध्ये ऊर्जा निर्माण केली.

# नवी मुंबईत भाजपतर्फे विकासकामांचा शुभारंभ

## बेलापूरमध्ये १७ कोटी ३३ लाखांच्या नागरी सुविधांचे भूमिपूजन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहर हे झपाट्याने विकासाच्या मार्गाने जात आहे. तसेच आमदार मंदा म्हात्रे यांचा बेलापूर विधानसभा क्षेत्रामध्ये विकास कामांच्या भूमिपूजनाचा धडाका सुरूच आहे. त्यांच्या निधीतून १७ कोटी ३३ लाखांच्या कामांचा शुभारंभ बेलापूर विभागामध्ये करण्यात आला.

बेलापूर विभागातील दिवाळे गावातील ग्रामस्थांची शाळा ही गेली ७० वर्षेहून अधिक जुनी पूर्वीची असून ती मोडकळीस अवस्थेत आहे. या शाळेचा पुनर्विकास करण्यासाठी आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रयत्नांतून रक्कम १० कोटी रुपये निधीची निविदा जाहीर करण्यात आली होती आणि त्याच अनुषंगाने रविवारी (दि.१३) दिवाळे गावातील न.मुं.म.पा.शाळा क्र. ११७ या शाळेचे भूमिपूजन दिवाळे गावातील



ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते झाले. नेरूळ येथील एसबीआय कॉलनी व इतर परिसरातील नागरिकांना आपला जीव मुठीत धरून पनवेल मार्गाच्या दिशेने रस्ता ओलांडावा लागत होता. त्यामुळे अनेकदा अपघाताचे प्रसंग घडले होते. याबाबत पर्याय म्हणून आमदार मंदा म्हात्रे यांच्या अथक प्रयत्नातून पाच कोटी नऊ लाख रुपये उपलब्ध करून सायन-पनवेल महामार्गावरील एसबीआय कॉलनी येथे पादचारी उड्डाणपुलाचा भूमिपूजन नेरूळ येथील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते झाले. सीबीडी सेक्टर ८ बी रमाबाई आंबेडकर नगर येथील आमदार मंदा म्हात्रे यांच्या अथक प्रयत्नांतून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विकास योजनेंतर्गत ४८ लाख रुपये उपलब्ध करून आरसीसी बॉक्स कलव्हर्ट बांधकामाचा भूमिपूजन रमाबाई आंबेडकर नगर येथील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते झाले.

आमदार निधीमधून ६० लाख रुपये खर्च करून सीबीडी येथील अय्यप्पा मंदिर येथे सभामंडपाचा उद्घाटन व स्वच्छता गृह उभारणे व इतर स्थापत्य कामांचा भूमिपूजन अय्यप्पा मंदिराच्या ज्येष्ठ पदाधिकारी व सदस्यांचे स्ते करण्यात आले. सीबीडी सेक्टर ८ बी रमाबाई आंबेडकर नगर येथे १५ लाख रुपये उपलब्ध करून समाज मंदिर उभारण्याच्या कामाचे भूमिपूजन ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते झाले. या सर्व नागरी विकास कामांचा भूमिपूजन एकाच दिवशी वेगवेगळ्या विभागात झाले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत कुमार कोळी, चंद्रकांत कोळी, सुरेश कोळी, संजय कोळी, श्याम कोळी, एल.पी.पाटील, अशोक कोळी, शिक्षणाधिकारी अरुणा यादव, मुख्याध्यापिका शोभा कुदळे, बालगडे मॅडम, पवार मॅडम, शिक्षकवृंद, माजी नगरसेविका अनिता शेट्टी, जयेश थोरवे, तानाजी किल्लेदार, बाजीराव पत्की, दामोदर पिल्ले, जयकुमार नायर, उत्तम नायर, दामोदर आडावेडी, रमा, पुष्पा, सिनु डॅनियल, राजू कोळी, नारायण वाघमारे, सुनील ओव्हल, पिंटू अण्णा, सन्नपा गायकवाड, तसेच बेलापूर विभागीय अधिकारी श्रीकांत तोडकर व संबंधित अधिकारी व असंख्य ज्येष्ठ नागरिक व महिला उपस्थित होते.

## वाशीमध्ये विद्यार्थ्यांना साडेपाच हजार वह्यांची भेट

### दशरथ भगत यांचा वाढदिवस उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्था व अन्य सहयोगी सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांच्या वतीने नवीन मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांचा जन्मदिन विविध उपक्रमांनी साजरा केला.

या वेळी माजी आमदार संदीप नाईक यांनी उपस्थित राहून भगत यांना जन्मदिनाचे अभीष्टचिंतन केले. माजी नगरसेविका फशीबाई भगत, माजी वैजयंती भगत या उपस्थित होत्या. या वेळी बुके नको बुक या संकल्पनेअंतर्गत नागरीकांना आवाहन करण्यात आले होते. त्या अंतर्गत साडेपाच हजार वह्या भेट म्हणून देण्यात आल्या. या वह्या गरजू विद्यार्थ्यांना देण्याचा संकल्प दशरथ भगत यांनी केला आहे.

दशरथ भगत यांनी नवी मुंबई शहरभर प्रत्येक नोडनिहाय उभ्या केलेल्या नवीन मुंबई बचाव अंतर्गत जागर जनजागृतीचा आंदोलनरुपी कार्यास २ वर्ष पूर्ण झाली. या वेळी त्यांनी झाल्याबद्दल, या कार्याचे स्मरण ज्योत प्रज्वलित करून करण्यात आले, मात्र जोपर्यंत सर्व नागरी सोयीसुविधांच्या भूखंडांचे नवीन मुंबईकरांसाठी पूर्णतः आरक्षण मंजूर होत नाही तोपर्यंत आंदोलन चालूच राहील, असा पुनःसंकल्प या वेळी करण्यात आला.




## नवी मुंबईत १६०८ देवींचे विसर्जन

**नवी मुंबई : बातमीदार**

गणेशोत्सवाप्रमाणेच ३ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत उत्साहात झालेल्या नवरात्रौत्सवातील विसर्जन सोहळा नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील २२ पारंपारिक विसर्जन स्थळांवर महापालिकेने केलेल्या योग्य नियोजनव्यवस्थेमध्ये सुव्यवस्थित रितीने झाला.



महापालिका क्षेत्रात एक हजार ४३७ घरगुती अथवा सोसायटीमधील देवी मूर्ती विसर्जनाप्रमाणेच १७१ सार्वजनिक देवी मूर्तींचे विसर्जन असे एकूण एक हजार ६०८ देवी मूर्तींचे विसर्जन भक्तिमय वातावरणात करण्यात आले.

यामध्ये बेलापूर विभागात पाच विसर्जन स्थळांवर ११२ घरगुती अथवा सोसायटी व २० सार्वजनिक, नेरूळ विभागात २ विसर्जन स्थळांवर ७१ घरगुती अथवा सोसायटी व २९ सार्वजनिक, वाशी विभागातील २ विसर्जन स्थळांवर १३८ घरगुती अथवा सोसायटी व ११ सार्वजनिक, तुर्भे विभागात ३ विसर्जन स्थळांवर १६२ घरगुती अथवा सोसायटी व २६ सार्वजनिक, कोपरखैरणे विभागात २ विसर्जन स्थळांवर १५१ घरगुती अथवा सोसायटी व ४२ सार्वजनिक, घणसोली विभागात ४ विसर्जन स्थळांवर ३०४ घरगुती अथवा सोसायटी व ९ सार्वजनिक, ऐरोली विभागात ३ विसर्जन स्थळांवर ८६ घरगुती अथवा सोसायटी व २३ सार्वजनिक आणि दिघा विभागात १ विसर्जन स्थळावर ४१३ घरगुती अथवा सोसायटी व ११ सार्वजनिक अशा एकूण एक हजार ४३७ घरगुती अथवा सोसायटी व १७१ सार्वजनिक अशाप्रकारे एकूण १ हजार ६८८ देवीमूर्तींना भावपूर्ण निरोप देत विसर्जन करण्यात आले.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील २२ विसर्जन स्थळांपैकी मुख्य १४ विसर्जन तलावांमध्ये जलप्रदूषण टाळण्यासाठी गॅबीयन वॉलची रचना करण्यात आलेली असून त्याच क्षेत्रात भाविकांनी देवीमूर्ती विसर्जन करून नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या आवाहनानुसार जलाशयातील जैवविविधतेची जपणूक केली.

## नवीन पनवेलमध्ये सैनिक हो तुमच्यासाठी उपक्रमाची सांगता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत विकास परिषद पनवेलच्या वतीने गेल्या पाच वर्षांपासून सैनिक हो तुमच्यासाठी हा उपक्रम राबवण्यात येत आहे. त्या अंतर्गत यंदाच्या उपक्रमाची सांगता रविवारी (दि.१३) नवीन पनवेलमध्ये झाली.

भारत विकास परिषद पनवेलच्या वतीने भारतीय सीमांचे अहोरात्र रक्षण करणाऱ्या भारतीय वीर जवानांना भारत विकास परिषदेतर्फे लोकसहभागाद्वारे पंधराशे किलो चिवडा, चकली, शेव, शंकरपाळे आणि अडुेचाळीस हजार लाडू देशाच्या विविध सीमांवर पाठविण्यात आले. याबरोबर अंदाजे ७००० ग्रीटिंग काड्‌र्स पाठविण्यात आली आहेत. दरवर्षी राबवण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे पनवेलकरांच्या







वतीने कौतुक करण्यात येते. त्यानुसार यंदाच्या वर्षी राबवण्यात आलेल्या या उपक्रमाची सांगता रविवारी नवीन पनवेलमध्ये झाली.

या वेळी अज्ञात शलाका या नावाच्या शूर वीरांगनांवर आधारित कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. वीरमाता अनुराधा गोरे यांच्या संकल्पनेतून शीतल तळपदे यांचे दिग्दर्शन आणि संध्या ओक यांची प्रस्तुती असा हा कार्यक्रम उपस्थित सर्वांच्या मनात देशप्रेम जागृत करणारा ठरला. या कार्यक्रमाला उपस्थित सर्वांचे कापडी पिशवी आणि आकर्षक पणत्या देऊन स्वागत करण्यात आले.

या सोहळ्याला वीरपत्नी रुपाली महंबरे, उमा कुलकर्णी, वर्षा ठाकूर, स्वाती कोळी, उपक्रम प्रमुख नितीन कानिटकर, भारत विकास परिषद पनवेल शाखेच्या अध्यक्ष डॉ. कीर्ती समुद्र, ज्योती कानिटकर यांच्यासह भारत विकास परिषदेचे सर्व पदाधिकारी आणि सभासद उपस्थित होते.

## खांदा कॉलनीत नवदुर्गा पुरस्कार



**पनवेल : वार्ताहर**

दिशा कल्चरल इव्हेंट्स प्रस्तुत दिशा महिला मंच व आर के ग्रुप आयोजित नवदुर्गा पुरस्कार व सन मराठी प्रस्तुत सोहळा सख्यांचा कार्यक्रम बेलेझ्झा बँक्वेट हॉल खांदा कॉलनी येथे मोठ्या उत्साहात झाला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे सिनेकलाकार आशिष पवार व आर के ग्रुपचे राजेंद्र कोलकर सर उपस्थित होते. या वेळी समाजात काम करणाऱ्या करुणा ईश्वर ढोरे, डॉ.श्वेता गजभिये भालेराव समाजसेविका शांती झा, पत्रकार दिपाली पारसकर, डॉ. शिल्पा भंडारवार, गौरी पाटील, डॉ. विशालाक्षी कानगुले, सौ आशा प्रवीण पाटील, वर्षा पाचभाई या नवदुर्गांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सिनेकलाकार आशिष पवार यांनी सख्यांचे मनोरंजनाचे खेळ घेऊन सोहळा सख्यांचा मोठ्या आनंदात साजरा केला. यावेळी ओरोस्माईल डेंटल क्लीनिकचे डॉ शिल्पा भंडारवार व अमित भंडारवार यांचे विशेष सहकार्य मिळाले.

महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळून देण्यासाठी नेहमीच मदत करणाऱ्या राजेंद्र कोलकर सरांनी उपक्रमाचे कौतुक करत दिशा व्यासपीठास शुभेच्छा दिल्या तसेच सन मराठी चॅनल वर सुरू होणाऱ्या सोहळा सख्यांचा या कार्यक्रमाचे देखील कौतुक करत शुभेच्छा दिल्या. या वेळी दिशा व्यासपिठाच्या निलम आंधळे, विद्या मोहिते, खुशी सावर्डेकर व इतर अनेक मान्यवर व सख्या उपस्थित होत्या.

## उरण ओएनजीसीतर्फे भोजनदान कार्यक्रम

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

ओएनजीसी उरणद्वारा धम्मचक्र प्रवर्तन दिनानिम्मित दीक्षाभूमी, नागपूर येथे सलग १४ व्या वर्षी भोजन दान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हा कार्यक्रम बुद्धाच्या शिकवणींच्या तत्त्व- करुणा आणि सामुदायिक सेवा या भावनांशी सुसंगत होता. दीक्षाभूमी, नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायासह बुद्ध धम्माची दीक्षा स्वीकारली, या घटनेची मार्मिक पार्श्वभूमी म्हणून लाखो अनुयायी नागपूर येथे भेट देत असतात.

भोजन दान कार्यक्रमाची सुरुवात सकाळी अजनी जंक्शन रेल्वे स्थानकासमोरील स्टॉलवर ओएनजीसी अधिकारी, स्थानिक मान्यवर आणि समाजातील सदस्यांच्या उपस्थितीत झालेल्या औपचारिक मेळाव्याने झाली. कार्यक्रमासाठी एन अशोक बाबू- हेड सामग्री व्यवस्थापन ओएनजीसी उरण,



धीरज उमरेडकर - हेड वित्त विभाग ओएनजीसी मेहसाणा, गौरव पतंगे- मॅनेजर एचआर ओएनजीसी उरण, विष्णु व्हटकर अध्यक्ष - एससी एसटी वेल्फेअर असोसिएशन ओएनजीसी उरण, निशिकांत वलादे सेक्रेटरी- एससी एसटी वेल्फेअर असोसिएशन ओएनजीसी उरण, विश्वास लोखंडे सीइसी मेंबर - एससी एसटी वेल्फेअर असोसिएशन ओएनजीसी उरण आणि इतर मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमांतर्गत सुमारे १५०० किलो नाश्ता आणि सुमारे ४५०० किलो जेवणाचे पाहुण्यांना वाटप करण्यात आले. दीक्षाभूमीवर आलेल्या २६००० हून अधिक यात्रेकरूंनी ओएनजीसी आयोजित भोजन दान कार्यक्रमाचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गौतम कदम यांच्यासह ३० हून अधिक ओएनजीसी कर्मचाऱ्यांनी दिवसरात्र अथक श्रमदान केले.

भोजन दानाचा हा कार्यक्रम सामाजिक जबाबदारी आणि समाजाच्या कल्याणासाठी ओएनजीसी च्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. ओएनजीसी उरणच्या उपक्रमाचा उद्देश केवळ पोषण प्रदान करणे नव्हे तर एकता वाढवणे आणि सहानुभूती आणि दयाळूपणाचा संदेश प्रसारित करणे हा आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून लांब प्रवास करुन थकून आलेल्या गोरगरीब भाविकांनी पोटभर जेवण मिळाल्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि ओएनजीसीचे आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी देवेंद्र कुमार त्रिवेदी प्लांट हेड ओएनजीसी उरण, भावना आठवले हेड एचआर ओएनजीसी उरण आणि मनीष मेहता हेड वित्त विभाग ओएनजीसी उरण यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# काळ नदीवर उभारणार नवीन पूल

## आमदार भरत गोगावलेंच्या हस्ते कामाचे भूमिपूजन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील सतत रहदारीचा व महत्त्वाचा म्हणून ओळखला जाणारा निजामपूर ते कोशिंबळे मार्गावरील पूल आहे. हा पूल जीर्ण झाल्याने या ठिकाणी आता नवीन पूल उभारण्यात येणार आहे. या पुलाच्या कामाचे भूमिपूजन शुक्रवारी आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले.



हा रहदारीचा पूल गेली अनेक वर्षांपासून दुर्लक्षित होता. या नदीवर शासनाने बंधारा बांधून पाणी अडवले होते. कोशिंबळे गावालगतच्या काळ नदीवर धरण बांधून पाणी अडवल्याने निजामपूर व परिसरातील गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला होता. निजामपूर ते कोशिंबळे तसेच परिसरातील अनेक गावांना या धरणावर पूल बांधल्याने दळणवळणासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग झाला. या पुलाचे कठडे पावसाळ्यात पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने तसेच पूल कमकुवत झाला होता. कोशिंबळे पोलीस पाटील दत्ताराम नाडकर यांनी आमदार भरत गोगावले यांच्याकडे ग्रामस्थांच्या वतीने मागणी केली. आमदार गोगावले यांनी या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून या पुलाच्या बांधकामासाठी साडेदहा कोटी रुपये मंजूर करून घेतले.

या वेळी शिवसेना संपर्कप्रमुख अरुण चाळके, युवासेना जिल्हाध्यक्ष विपुल उभारे, तालुका प्रमुख महिंद्र मानकर, दाखणे माजी सरपंच विश्वास उभारे, उपतालुका प्रमुख सुधीर पवार, माजी विभाग प्रमुख कोंडू फाळके, निजामपूर माजी सरपंच हमजा जालगावकर, शाखा प्रमुख पवन कोळवणकर, निजामपूर माजी उपसरपंच गणेश समेळ, निजामपूर शहरप्रमुख गणेश पवार, ग्रामस्थ जयराम नाडकर, रमेश नाडकर, अशोक नाडकर, मुंबई मंडळाचे अध्यक्ष विश्वास नाडकर, वामन नाडकर, शिवाजी नाडकर, गुणाजी नाडकर, चंद्रकांत नाडकर, विठोबा राणे, बळीराम राणे, विलास नाडकर, तुळाजी भोकरे, नंदा नाडकर, रामचंद्र नाडकर, राजेंद्र नाडकर, दिनेश नाडकर, देवचंद नाडकर, दीपक नाडकर, ग्रामस्थ उपस्थित होते.

या पुलाला प्रशासकीय मान्यता पावसाळ्यापूर्वी मिळाली असून १० कोटी ५० लाख रुपये खर्चून उभारण्यात येणार आहे. त्याची रेटनिंग वॉल धरून लांबी ८० मीटर व ८ मीटर रुंदीचा होणार आहे.

---

## निवडक

### डॉ. इस्माईल रहाटविलकर यांचा सन्मान



**माणगाव** : येथील अल्फा हॉस्पिटलचे डॉ. इस्माईल हुसेन रहाटविलकर यांना वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष तथा शिवसेना विधिमंडळ पक्षप्रतोद आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते वैद्यकीय सेवा पुरस्काराने सन्मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. तालुका पत्रकार संघाच्या झालेल्या भव्य दिव्य अशा कार्यक्रमात हा गौरव करण्यात आला. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.

### श्री गोरक्षनाथ मंदिर मंडळातर्फे कार्यक्रम



**माणगाव** : दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्री गोरक्षनाथ मंदिर ढालघर फाटा येथे नवरात्रोत्सव विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. मंडळाच्या या उत्सवात दैनंदिन पूजा, होमहवन, श्रीमद भगवतगीतेवर प्रवचने, भजन यांसारखे पारमार्थिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. उत्सवकाळात वयक्तिक नामसाधना, ध्यानधारणा, श्री देवी यज्ञविधी याचबरोबर सन २०२३-२४ शैक्षणिक वर्षातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा रायगड भूषण प. पु. गुरुवर्य दादा महाराज शिंदे व रायगड भूषण ज्येष्ठ गुरुबंधू पूज्य खाडे महाराज, विजय मेथा यांच्या हस्ते झाला, तसेच नवनाथ सांप्रदायी, नवीन नामधारक दिक्षा विधी घेण्यात आला.



**माणगाव : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथील नगरपंचायतीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शर्मिला सुर्वे यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**



**अलिबाग : धेरंड येथील सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळातर्फे नवरात्रोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. मंडळाचे सल्लागार गोविंद पाटील यांनी रथामध्ये देवीची मिरवणूक काढली. मंडळाचे अध्यक्ष महेश पाटील, उपाध्यक्ष निकेश पाटील, सर्व सभासद व ग्रामस्थांनी मिरवणुकीत सहभाग घेतला.**

---

## माथेरानमध्ये परतीच्या पावसाची दमदार हजेरी

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान शहरात परतीच्या पावसाने दमदार हजेरी लावली. त्यामुळे नागरिकांची आणि पर्यटकांची चांगलीच तारांबळ उडाली. शहरावर धुक्याची चादर पसरलेली दिसत होती. विद्युतपुरवठा खंडित झाल्याने सायंकाळीच सर्वत्र अंधार दिसत होता. काही पर्यटक, नागरिक आच्छादलेल्या धुक्यातून वाट काढत दिसत होते.

वेधशाळेने दिलेल्या अनुमानानुसार, माथेरान शहराला मागील काही दिवसांपासून सायंकाळच्या वेळी परतीचा पाऊस झोडपून काढत आहे. ढगांच्या गडगडाटासह व विजांच्या लखलखाटात सायंकाळी पावसाने दमदार हजेरी लावली. मोठ्या आवाजात वीजा चमकत होत्या.

ढगांचा आवाजदेखील धडकी भरवणार होता. संपूर्ण माथेरानमध्ये धुक्याची चादर पसरली होती. धुक्याच्या दुलईत येथील पॉईंट, रस्ते आणि रेल्वे मार्ग हरवलेले दिसत होते. १२५ मिमी पावसाची नोंद करण्यात आली.



येथे बरसलेल्या परतीच्या पावसामुळे रस्त्यांवर पाणी वाहताना दिसत होते. रात्री उशिरापर्यंत विद्युत पुरवठा काही भागात सुरळीत झाला नव्हता. वीजपुरवठा सुरळीत नसल्याचा परिणाम येथील ई-रिक्षांवर झाला.

---

## रायगड गणित संबोध परीक्षेत नेणवली शाळेतील विद्यार्थी उत्तीर्ण

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील नेणवली शाळेने रायगड गणित संबोध परीक्षा २०२३-२४मध्ये उल्लेखनीय कामगिरी करीत सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. याचबरोबर, इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी संस्कृती कृष्णा खराडे ही सुधागड तालुक्यात प्रथम आली असून तिला शिष्यवृत्ती मिळाली आहे.



सुधागड गणित मंडळामार्फत सोमवारी (दि.१४) झालेल्या बक्षीस वितरण सोहळ्यात सुधागड तालुका गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे व सर्व गणित अध्यापक मंडळ सदस्यांमार्फत संस्कृतीला संस्कृती कृष्णा खराडे हिच्या या यशासाठी अभिनंदन करण्यात आले, तसेच विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. शाळेने गणिताच्या अभ्यासासाठी विविध उपक्रम राबवले होते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना मदत झाली.

> **रायगड गणित संबोध परीक्षेत प्रथमच नेणवली शाळेने सहभाग घेऊन उज्वल यश मिळवले. शिष्यवृत्तीदेखील मिळवली त्याबद्दल अभिमान वाटतो.**
> **-राजेंद्र अंबीके,** मुख्याध्यापक, नेणवली

---

## मुरुडमधील मोरे, शिघ्रे ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश



**मुरुड : प्रतिनिधी**

तालुक्यात शिवसेनेने मोठी आघाडी घेतली असून रविवारी (दि.१३) आमदार महेंद्र दळवी यांच्या उपस्थितीत वाळवटी, विहूर ग्रामपंचायत अंतर्गत मोरे गावातील आगरी समाज व शिघ्रे नावीवाडी येथील ग्रामस्थांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे.

या वेळी शिवसेनेचे जिल्हा संघटक दिनेश मिणमिने, रायगड उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, मुरुड तालुका संघटक यशवंत पाटील, तालुका प्रमुख ऋषिकात डोंगरीकर, शहर प्रमुख संदीप पाटील, शिवसेना नेते विघ्नेश माळी, माजी सरपंच भाई सुर्वे, युवा नेते दीपेश वरणकर आदी उपस्थित होते.



आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले की, विकासाची चिंता करू नका. मी आपल्यासोबत आहे. मुरुड तालुक्यात विकासाची नवी दिशा राखली जाणार असून कोट्यवधी रुपये विकासासाठी आणले आहेत. तुम्ही आमच्यावर टाकलेल्या विश्वासाला कधीच तडा जाऊ देणार नाही. त्याचप्रमाणे शिवसेना विकासासाठी कटिबद्ध असून कोणताच भाग विकासापासून वंचित राहणार नाही.

---

## माथाडी आणि जनरल कामगार संघटनेच्या कार्यालयाचे उद्घाटन







**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माथाडी कामगार आणि जनरल कामगार संघटनेच्या कार्यालयाचे पेण रामवाडी येथे अध्यक्ष राजेंद्र केदार कार्याध्यक्ष कैलास पाटील आणि सचिव राजेश महाडिक यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या वेळी राजेंद्र केदार यांनी सांगितले की, राज्यातील अनेक माथाडी तसेच बांधकाम कामगार असंघटित असल्याने ते हक्काच्या सोयीसुविधांपासून वंचित आहेत. त्यामुळे अशा कामगारांनी एकत्र येत या संघटनेत काम करणे गरजेचे आहे, असे आवाहन केले.

कामगार संघटनेच्या जिल्हाध्यक्षा शितल माळी, कार्याध्यक्ष निकीत पाटील यांच्या नेतृत्वाखाली रायगड जिल्ह्यातील पेण तालुकाध्यक्ष शोमेर पेणकर, महाड दिलीप जाधव, रोहा प्रीतम पाटील, तृप्ती बामणे, म्हसळा शहानवाज उकये, श्रीवर्धन विप्राली पुसाळकर, तेजस्विनी महाले, खालापूर अमोल खाडे, महाड सुनीता तळेकर, माणगाव महादेव कदम, शहराध्यक्ष सुबोध पवार, सुधागड- पाली निलेश खोडागले, शहर अध्यक्ष उमेश पाटील, खालापूर अमोल खाडे, शहर अध्यक्ष संजय पाटील आदींना नियुक्तीपत्र देण्यात आले.

---

## हिमाचल प्रदेश ग्रामीण विकास यंत्रणेकडून तांबाटीमध्ये पाहणी

**चौक : प्रतिनिधी**

हिमाचल प्रदेशातील राज्य ग्रामीण विकास यंत्रणेच्या पदाधिकाऱ्यांनी ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी येथे भेट देत येथील ग्रामविकासाचे विशेष कौतुक केले.



माझी वसुंधरा अंतर्गत संपूर्ण कोकण विभागातून प्रथम क्रमांक प्राप्त करून खालापूर तालुक्यातून ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी यांनी प्रथम येण्याचा मान पटकाविला आहे. रायगड जिल्हा परिषद यांच्याकडून आयएसओ मानांकनदेखील प्राप्त झाले आहे, सरपंच अविनाश आम्ले व ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम, उपसरपंच, सदस्य, कर्मचारी, याचबरोबर अनेक शासकीय अधिकारी, कर्मचारी यांची मेहनत आहे.

राज्य सरकारची अंगभूत यशदा यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य ग्रामीण विकास संस्था संचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, सत्र संचालक डॉ. रामप्रसाद पोले आणि यशदाचे समन्वयक ऋषिकेश शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हिमाचल प्रदेशचे डीपीओ श्रावण कुमार, ब्लॉक डेव्हलपमेंट ओम पाल, प्रधान ग्रामीण सौ. शुभ्रा, जिल्हा परिषद सदस्य सौ. सत्त्या यांच्यासह हिमाचल प्रदेशातील अधिकारी, लोकप्रतिनिधी, संस्थेमधील अशा ३० जणांचे पथकाने संपूर्ण ग्रामपंचायत परिसरात फिरून राबविलेल्या विविध योजना आणि कामांची पाहणी केली.

आपल्या कामांची व योजनांची अंमलबजावणी आम्ही हिमाचल प्रदेशात राबविण्याचा प्रयत्न करू, अशी प्रशंसा डीपीओ श्रावण कुमार यांनी केली.

---

## श्री धावीर महाराज पालखी सोहळ्याची दुसऱ्या दिवशी सांगता

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्याचे ग्रामदैवत श्री धाविर महाराजांची रविवारी पहाटे सुरू झालेल्या पालखी सोहळ्याची सांगता दुसऱ्या दिवशी सोमवारी (दि.१४) दुपारी झाली. शहरात फिरून रोहेकरांना दर्शन देत आणि गावामध्ये बंधुभेटी करीत २९ तासांनंतर देव मंदिरात परतले. या वेळी रायगड पोलिसांच्या पथकाने श्री धाविर महाराजांना पुन्हा सशस्त्र मानवंदना दिली. महाआरती आणि सेवेकऱ्यांचे मानपान कार्यक्रमानंतर पालखी उत्सवाची सांगता झाली, उत्सवात सेवेकरी तरुणांनी अथक, अखंडित आणि अविश्रांत परिश्रम घेतले.



एका कुटुंबातील सोहळ्याप्रमाणे अवघ्या गावाचा एक आगळा वेगळा उत्सव असलेल्या या उत्सवात पालखी बरोबर हजारो भक्तगणांनी रात्र जागून काढली, समेळ वाद्य, हळगी, खालुबाजे, झांज पथके, ताशे, अलिबाग आणि रोहा येथील नगारे पथक या उत्सवाची शोभा वाढविली, तर हजारो भक्तांच्या सोबतीने श्री महाराजांच्या पालखीने रोहा नगरीची प्रदक्षिणा पूर्ण केली. या वेळी परंपरेनुसार मंदिर ट्रस्ट आणि उत्सव समितीकडून रायगड पोलीस, महसूल विभाग, रोहा नगर पालिका, महावितरण विभाग, उत्सवाचे मानकरी आदींसह ३० तास पालखी उत्सवात अखंडपणे विविध प्रकारे सेवा देणाऱ्या सेवेकऱ्यांना प्रसादाचे नारळ भेट देत त्यांचे सन्मान करण्यात आले.

या वेळी पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, ट्रस्टचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, कार्यवाह मकरंद बारटक्के, उत्सव समितीचे अध्यक्ष मयुर पायगुडे, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, विश्वस्त नितिन परब, विजयराव मोरे, महेश सरदार, प्रकाश पवार, लालताप्रसाद कुशवाह, संदीप सरफळे आदी ट्रस्ट आणि उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. या पालखी सोहळ्यासाठी ट्रस्टचे प्रमुख पदाधिकाऱ्यांसह उत्सव समितीचे अध्यक्ष मयुर पायगुडे, कार्यवाह भुपेंद्र धाटावकर, सहकार्यवाह दर्शन कदम, सहकार्यवाह निखिल अमृसकर, उपाध्यक्ष नितेश जाधव, कुमार पाशिलकर, खजिनदार सुरज राऊत, सहखजिनदार विनोद पवार आदींसह पदाधिकाऱ्यांनी या पालखी सोहळ्यात अविश्रांत परिश्रम घेतले.

### ट्रस्टने मानले पालकमंत्री उदय सामंतांचे आभार

***यंदा उत्सवात बँड पथकासह पोलीस कुमक वाढवून दिल्याने पालखी समारोप प्रसंगी ट्रस्टच्या वतीने मकरंद बारटक्के यांनी पालकमंत्री उदय सामंतांचे आभार मानले.***

# रणजी करंडक : बडोद्याकडून मुंबईचा पराभव

**वडोदरा : वृत्तसंस्था**

रणजी करंडक एलिट २०२४-२५ या स्पर्धेतील गट अ सामन्यात मुंबई आणि बडोद्याचा संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात बडोद्याने मोठी उलथापालथ करत ४२ वेळा रणजी चॅम्पियन असलेल्या मुंबई संघाचा ८४ धावांनी दारुण पराभव केला आहे.

बडोद्याने पहिल्या डावात २९० धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात मुंबईचा संघ २१४ धावांच करू शकला. यानंतर ७६ धावांची आघाडी घेतल्यानंतर दुसऱ्या डावात बडोद्याने १८५ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात मुंबईचा ११७ धावां गारद झाला.



अशाप्रकारे बलाढ्य मुंबई संघाविरुद्ध बडोद्याने दणदणीत विजय नोंदवला. भार्गव भट्टने १० विकेट्स घेत बडोद्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

तिसऱ्या दिवशी पृथ्वी शॉ आणि हार्दिक तमोरच्या विकेट्स गमावल्यानंतर मुंबईने २ बाद ४२ धावा केल्या होत्या. यानंतर बडोद्याच्या भार्गव भट्टने अजिंक्य रहाणे आणि आयुष म्हात्रे यांच्या महत्त्वपूर्ण विकेट घेत धावांचा पाठलाग करणाऱ्या मुंबईला अडचणीत आणले. भारतीय संघात पुनरागमन करण्याच्या प्रयत्नात असलेला श्रेयस अय्यर, सिद्धेश लाडसह मुंबईचा डाव पुन्हा रूळावर आणण्यात यशस्वी ठरला. या दोघांनी ४१ धावांची भर घातली. यानंतर श्रेयस ३० धावा काढून फिरकीपटूचा बळी ठरला.

यानंतर भट्टने अनुभवी शम्स मुलाणी आणि शार्दुल ठाकूर यांच्या विकेट्स घेत मुंबईच्या डावाला खिंडार पाडले, मात्र दुसरीकडे लाडने चमकदार कामगिरी करणे सुरूच ठेवले आणि अखेरीस सामना निकराच्या लढतीकडे वळला. मुंबईच्या या फलंदाजाने ९४ चेंडूत ५९ धावा करत गतविजेत्या संघाला विजयाच्या वाटेवर नेऊन ठेवले. चौथ्या दिवशी सकाळचे सत्र निकालाच्या आशेने वाढविण्यात आले, मात्र, तनुष कोटियन आणि मोहित अवस्थी प्रभाव पाडण्यात अपयशी ठरल्याने लाडला दुसऱ्या टोकाकडून कोणतीही साथ मिळाली नाही. यानंतर भट्टने सामन्यातील शेवटची विकेट लाडच्या रूपात घेत बडोद्याच्या शानदार विजयावर शिक्कामोर्तब केले.

# पराभवामुळे भारताचा उपांत्य फेरीचा मार्ग खडतर

## ऑस्ट्रेलियाच्या विजयात संपूर्ण संघाचे योगदान -हरमनप्रीत कौर



**शारजा : वृत्तसंस्था**

महिला टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतील 'करो या मरो'च्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा नऊ धावांनी पराभव केला चांगल्या नेट रन रेटच्या जोरावर अंतिम चारमध्ये स्थान मिळवले. त्यामुळे आता भारतीय संघाला उपांत्य फेरीच्या प्रवेशासाठी इतर संघाच्या निकालावर अवलंबून रहावे लागेल.

या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत आठ विकेट्स गमावत १५१ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारतीय संघ २० षटकांत नऊ गडी गमावून १४२ धावाच करू शकला. या सामन्यातील पराभवानंतर भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने निराशा व्यक्त केली. त्याबरोबर ऑस्ट्रेलियाचा उल्लेख करताना ती म्हणाले की, त्यांच्या विजयात संपूर्ण संघाचे योगदान होते.

सामन्यानंतर हरमनप्रीत म्हणाली की, मला वाटते की त्यांच्या विजयात संपूर्ण संघाचे योगदान होते, ते कोणत्याही एक किंवा दोन खेळाडूंवर अवलंबून नव्हते. त्यांच्याकडे योगदान देणारे अनेक अष्टपैलू खेळाडू आहेत. आम्ही चांगले नियोजन केले होते आणि आम्ही शेवटपर्यंत सामन्यात होतो, पण त्यांनी सहज धावा दिल्या नाहीत. त्यामुळे आम्हाला पुढे जाणे कठीण झाले. राधाने खूप चांगली गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण केले.

'हे एक असे लक्ष्य होते, गाठता आले असते. दीप्ती आणि मी फलंदाजी करत होतो, तेव्हा आम्हाला काही मोठे फटके मारण्यासारखे चेंडू मिळाले होते, परंतु आम्ही त्याचा फायदा घेऊ शकलो नाही. आजच्या सामन्यात आपण ऑस्ट्रेलियाकडून आपण खूप काही शिकू शकतो. आमच्या हातात जे होते ते आम्ही करण्याचा प्रयत्न केला, परंतु काही गोष्टी तुमच्या हातात नसतात,' असेही भारतीय कर्णधाराने नमूद केले.

दरम्यान, ऑस्ट्रेलियाच्या नेट रनरेटला मागे टाकण्यासाठी भारताला १०.२ षटकांत किंवा त्यापेक्षा कमी वेळात लक्ष्याचा पाठलाग करायचा होता, मात्र आता पराभूत झाल्याने भारताचा उपांत्य फेरीतील मार्ग खडतर झाला आहे. आता भारताचे भवितव्य इतर संघांच्या निकालावर अवलंबून आहे.

# न्हावे क्रिकेट संघाच्या नव्या हंगामास प्रारंभ

**धाटाव : प्रतिनिधी**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या दसऱ्याच्या निमित्ताने रोहा तालुक्यातील न्हावे येथील सागर सम्राट क्रिकेट संघाने नव्या हंगामाचा प्रारंभ केला आहे.

सरपंच नितीन डबीर यांच्या हस्ते पटांगणात याचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी खेळाचे शस्त्र म्हणून बॅट, बॉल, स्टम्प यांची पूजा करण्यात आली. आजी, माजी खेळाडू, ग्रामस्थ व क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

न्हावे क्रिकेट संघाची स्थापना सन १९६५मध्ये झाली. १९७५नंतर एक करमणुकीचे साधन म्हणून शाळेतील मुलेही क्रिकेट खेळायला लागली. १९८० ते १९८३दरम्यान गावातील मुलांकडून स्थानिक



पातळीवर स्पर्धात्मक खेळास सुरुवात झाली. १९८३नंतर वेगवेगळ्या नावांनी संघ विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊ लागला. १९८६-८७ साली करंजवीरा-कोपरी येथे स्पर्धा खेळत असताना त्या स्पर्धेतील एका टीमचे सागर सम्राट हे नाव तत्कालीन संघ सहकाऱ्यांना विलक्षण आवडल्यामुळे व आपल्या संघाला ते नाव तंतोतंत जुळत असल्याने संघातील प्रमुख खेळाडू व कर्णधार यांनी न्हावे क्रिकेट संघाला सागर सम्राट हे नाव दिले. हा संघ नावारूपाला आलेला आहे. नव्या हंगामाच्या शुभारंभावेळी मान्यवरांनी क्रिकेट संघाला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# कामिंदू मेंडीस आयसीसी प्लेअर ऑफ द मंथ

**दुबई : वृत्तसंस्था**

शतकासह वेगवेगळ्या विक्रमांची नोंद करत सप्टेंबर महिना गाजवणारा श्रीलंकेचा स्टार फलंदाज कामिंदू मेंडीस याला आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) प्लेअर ऑफ द मंथ हा पुरस्कार जाहीर केला आहे. याद्वारे त्याने एक विक्रमही आपल्या नावे केला.

आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ पुरस्कारासाठी मेंडिसशिवाय श्रीलंकन फिरकीपटू प्रभात जयसूर्या आणि ऑस्ट्रेलियाचा धडाकेबाज फलंदाज ट्रॅविस हेड ही मंडळी शर्यतीत होती, पण त्यांना मागे टाकत मेंडिसने मानाच्या आणि प्रतिष्ठित पुरस्कारावर नाव कोरले. विशेष म्हणजे या वर्षात दुसऱ्यांदा त्याला हा पुरस्कार मिळाला आहे. २०२४ या कॅलेंडर वर्षात दोन वेळा हा पुरस्कार मिळवणारा तो पहिला खेळाडू ठरला आहे. याबद्दल अवघ्या क्रिकेट विश्वातून त्याचे कौतुक होत आहे.

# भारताविरुद्धच्या मालिकेपूर्वी ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का! स्टार अष्टपैलू कॅमरून ग्रीन दुखापतीमुळे संघाबाहेर

**सिडनी : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पाच कसोटी सामन्यांची बॉर्डर-गावसकर ट्रॉफी खेळवली जाणार आहे, पण याआधीच ऑस्ट्रेलियासाठी एक वाईट बातमी समोर आली आहे. संघाचा स्टार अष्टपैलू कॅमेरून ग्रीन दुखापतीमुळे भारताविरुद्धच्या मालिकेतून आणि चॅम्पियन्स ट्रॉफीमधून बाहेर पडला आहे.

ग्रीनने यापूर्वी चांगली कामगिरी करत संघासाठी अनेक सामने स्वबळावर जिंकून दिले होते. त्यामुळे ग्रीनच्या दुखापतीमुळे ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का बसला आहे.

इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात कॅमेरून ग्रीनला दुखापत झाली होती. यानंतर स्कॅनमध्ये त्याला स्ट्रेस फ्रॅक्चर झाल्याचे निदान झाले आणि आता त्याने पाठीवर शस्त्रक्रिया करण्याचा पर्याय निवडला आहे. आता त्याला बरे होण्यासाठी किमान सहा महिने लागतील. याच कारणामुळे तो भारताविरुद्ध होणाऱ्या बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमधून बाहेर पडला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी आणि श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेतूनही तो बाहेर पडणे जवळपास निश्चित आहे, कारण चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ फेब्रुवारीमध्ये पाकिस्तानच्या भूमीवर होणार आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या अहवालानुसार तो आयपीएलमध्ये खेळण्याची शक्यता कमी आहे.

कॅमेरून ग्रीनला दुखापतीमुळे भारताविरुद्धच्या बॉर्डर-गावसकर ट्रॉफीतून बाहेर पडाव लागल्याने ऑस्ट्रेलियन संघाला मोठा धक्का बसला आहे, कारण ग्रीन हा त्याच्या उत्कृष्ट गोलंदाजी आणि मधल्या फळीत दमदार फलंदाजीसाठी ओळखला जातो. भारताविरुद्धच्या मालिकेत ऑस्ट्रेलियाला त्याची उणीव नक्की भासेल. ग्रीनला ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज जेम्स पॅटिनसन आणि भारतीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह सारखीच दुखापत झाली आहे.

कॅमेरून ग्रीनने २०२०मध्ये ऑस्ट्रेलियाकडून कसोटी पदार्पण केले. तेव्हापासून तो संघाचा महत्त्वाचा दुवा ठरला आहे. त्याने आतापर्यंत ऑस्ट्रेलियासाठी २८ कसोटी सामन्यांमध्ये १३७७ धावा आणि ३५ विकेट्स घेतल्या आहेत. त्याने दोन शतके आणि सहा अर्धशतकेही झळकावली आहेत. ग्रीनने ऑस्ट्रेलियासाठी २८ एकदिवसीय आणि १३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामनेही खेळले आहेत.

# पाकिस्तानची 'कसोटी'; घरच्या मैदानात लाज राखण्याचे आव्हान

**मुल्तान : वृत्तसंस्था**

तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात पाकिस्तानला दारुण पराभव पत्कारावा लागला. मुल्तान येथे मंगळवार (दि. १५)पासून दुसऱ्या सामन्याचा थरार रंगेल.

पहिल्या कसोटी सामन्यात मोठा विजय मिळवल्यानंतर इंग्लंडने मालिका जिंकण्याच्या दृष्टीने पाऊल टाकले आहे. सलामीच्या सामन्याला मुकलेला बेन स्टोक्स दुसऱ्या सामन्यातून पुनरागमन करण्यासाठी सज्ज आहे. इंग्लंड क्रिकेट बोर्डाने दुसऱ्या कसोटीसाठी स्टोक्सच्या नेतृत्वातील संघ जाहीर केला. सलामीच्या सामन्यात इंग्लंडने पाकिस्तानचा एक डाव आणि ४७ धावांनी पराभव केला.

पहिला सामना मोठ्या फरकाने जिंकून पाहुण्या इंग्लिश संघाने विजयी सलामी दिली. मोठ्या प्रमाणात टीका झाल्यानंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने उर्वरित मालिकेसाठी काही धाडसी निर्णय घेतले. उर्वरित मालिकेसाठी 'पीसीबी'ने आपला संघ जाहीर केला. संघाचा माजी कर्णधार बाबर आझम, प्रमुख गोलंदाज शाहीन शाह आफ्रिदी आणि युवा गोलंदाज नसीम शाह यांना दुसऱ्या आणि तिसऱ्या सामन्यातून डच्चू देण्यात आला. या तिघांना विश्रांती देण्यात आली असल्याचे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने सांगितले, मात्र खराब फॉर्मचा सामना करत असलेले हे त्रिकुट साजेशी कामगिरी करण्यात अपयशी ठरल्याने त्यांना बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला.

**दुसऱ्या कसोटीसाठी इंग्लंडचा संघ** : बेन स्टोक्स (कर्णधार), जॅक क्रॉली, बेन डकेट, ओली पोप, जो रुट, हॅरी ब्रूक, जेमी स्मिथ, ब्रिडन कार्स, मॅट पॉट्स, जॅक लीच, शोएब बशीर.

**उर्वरित मालिकेसाठी पाकिस्तानचा संघ** : शान मसूद (कर्णधार), सौद शकील, आमिर जमाल, अब्दुला शफीक, हसीबुल्लाह, कामरान घुलाम, मेहरान मुमताज, मीर हमझा, मोहम्मद अली, मोहम्मद हुरैरा, मोहम्मद रिझवान, नोमान अली, सैय अयुब, साजिद खान, सलमान अली अघा, झाहीद मेहमूद.

# नव्या चेंडूच्या सरावाचा फायदा झाला -संजू सॅमसन

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

बांगलादेशविरुद्धच्या टी-२० सामन्यात भारताचा यष्टिरक्षक-फलंदाज संजू सॅमसन याने धडाकेबाज खेळी करत शतक ठोकले. याबद्दल बोलताना त्याने, मी राजस्थान रॉयल्सच्या अकादमीत जाऊन नव्या चेंडूवर बराच सराव केला. त्याचा मला खूप फायदा झाला. अन्य मालिकेपेक्षा यावेळी १० टक्के अधिक तयारीनिशी मी आलो होतो, असे म्हटले.

भारतीय क्रिकेटमधील प्रतिभावान खेळाडूंमध्ये सॅमसनची गणना केली जाते, मात्र कामगिरीत सातत्य राखता येत नसल्याने त्याच्यावर बरेचदा टीकाही होते. सॅमसनने आपल्या अलौकिक प्रतिभेचे पुन्हा दर्शन घडवताना बांगलादेशविरुद्धच्या तिसऱ्या ट्रेन्टी-२० सामन्यात ४७ चेंडूत ११ चौकार आणि आठ षटकारांच्या साहाय्याने १११ धावांची अप्रतिम खेळी केली.



श्रीलंकेत सलग दोन ट्रेन्टी-२० सामन्यांत शून्यावर बाद झाल्यानंतर बांगलादेशविरूद्धच्या पहिल्या दोन सामन्यात संजू मोठी खेळी करण्यात अपयशी ठरला होता. त्यानंतरही कर्णधार सूर्यकुमार यादव आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी त्याच्यावरील विश्वास कायम ठेवला, जो संजूने सार्थ ठरवला.

संजू म्हणाला, एका सामन्यात अपयशी ठरल्यानंतर पुढील सामन्यात केवळ स्वतः चा आणि आपल्या धावांचा विचार मनात येणे सहज शक्य आहे, मात्र मी अशा प्रकारचा व्यक्ती नाही. मी माझे सहकारी आणि संघाचा विचार करतो. यश असो वा अपयश, ते मला माझ्या पद्धतीने मिळवायचे आहे. मी आत्मकेंद्री नाही. माझ्यासाठी संघच महत्त्वाचा आहे.

सर्वोच्च स्तरावर खेळताना अपयश येणार आणि अपेक्षांचे दडपणही असणार याची कल्पना असल्याने त्यातून पळवाट काढणे शक्य नाही. मी आता या गोष्टी हाताळण्यास शिकलो आहे आणि याचा माझ्या कामगिरीवर सकारात्मक परिणाम झाला. याचे श्रेय माझे सर्व सहकारी, कर्णधार आणि प्रशिक्षक यांना जाते, असे संजूने सांगितले तसेच अनेकदा अपयश येऊनही आपल्यावरील विश्वास कायम राखल्याबद्दल त्याने संघ व्यवस्थापनाचेही आभार मानले.














दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com